रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ८४
www.ramprahar.com
शनिवार, ११ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘कंपनीची मुजोरी ऐकून घेतली जाणार नाही’/२
अलिबागच्या खंडाळे गावात जमीन घोटाळा/५
पहिला दिवस भारताचा! यशस्वी जैस्वालचे शतक/८

## लाडक्या बहिणींना दिवाळी भेट; सन्मान निधीचे वितरण



**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना सप्टेंबर महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा होती, पण आता ही प्रतीक्षा संपली आहे, कारण लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस शुक्रवार (दि.१०)पासून सुरुवात झाली. या योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार कार्डशी संलग्न असलेल्या बँक खात्यात सन्मान निधी दोन दिवसांत वितरित होईल, अशी माहिती राज्याच्या महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत दिली. यामुळे लाडक्या बहिणींना दिवाळीची भेट मिळणार आहे. लाडकी बहीण योजनेतर्गंत पात्र महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपये जमा केले जातात, ज्यातून त्यांना आर्थिक आधार दिला जातो.

# सरकार देणार शेतकऱ्यांना बळ

## प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेचा आज शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेबाबत केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा करण्यात आली होती. या योजनेचा शुभारंभ शनिवारी (दि. ११) सकाळी १०.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीत होणार आहे.

महाराष्ट्र राज्यस्तरीय कार्यक्रम कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृह या ठिकाणी होणार आहे. कृषी क्षेत्रात प्रयोगशील व प्रगतिशील कामगिरी करणारे ३००हून अधिक शेतकरी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.



या योजनेत कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या १०० जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. यात महाराष्ट्र राज्यातील पालघर, रायगड, धुळे छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झालेली आहे.

सद्य:स्थितीमध्ये राज्यात केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पीक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणे तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे.

### रायगडचीही निवड

**अलिबाग :** केंद्र सरकारने सुरू केलेल्या महत्त्वाकांक्षी पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेसाठी महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्याचाही समावेश केलेला आहे. अलिबाग चेंढरे येथील स्व. गोविंद बाबू नार्वेकर सभागृहात या योजनेचा जिल्हास्तरीय उद्घाटन समारंभ सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

# वीजपुरवठा खंडित करून नागरिकांना त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या दोन दिवसांपासून पनवेल ते खारघर परिसरातील विविध ठिकाणी जाणूनबुजून वीजपुरवठा खंडित करून नागरिकांना त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. १०) पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले तसेच एमएसईबीचे अधिकारी डी.आर. पाटील यांच्यात बैठक झाली. दरम्यान, गुरुवारीही या विषयावर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती.

या बैठकीदरम्यान एमएसईबीच्या अधिकाऱ्यांनी संप मागे घेतल्याची कबुली दिली तसेच पुढील एक ते दीड तासात वीजपुरवठा पूर्ववत होईल, असे आश्वासन दिले. याशिवाय, वीजपुरवठा खंडित करण्यामागे जबाबदार ठरलेल्या कर्मचाऱ्यांवर सक्त कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट केले.

बैठकीला भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, अजय बहिरा, शिवदास कांबळे तसेच केदार भगत, प्रितम म्हात्रे, रूपेश नागवेकर, पवन सोनी, उमेश इनामदार, एनपी बिल्डर्सचे प्रशांत पाटील, ओरियन मॉलचे पूर्णंदू साळवी यांच्यासह व्यापारी, उद्योजक उपस्थित होते.

या बैठकीनंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना संपाच्या आडून नागरिकांना त्रास देणाऱ्यांवर संतप्त ताशेरे ओढले. त्यांनी म्हटले की, पनवेलपासून खारघरपर्यंत विविध ठिकाणी परवापासून



वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या विरोधात नागरिक प्रचंड संतप्त झाले होते. त्यांनी एमएसईबी, एमएसईडीसीएल पोलीस ठाणे गाठले. संपाचा गैरफायदा घेत जाणीवपूर्वक वीजपुरवठा खंडित करण्याचे प्रकार घडले. पनवेलच्या बाजारपेठेत तर प्रचंड उद्रेक पहायला मिळाला. मोहल्ला विभागातील नागरिकांची लाईट नव्हती, एसटी डेपो व रेल्वेस्थानकानजीक झोपडपट्टीमध्येही तीच परिस्थिती होती. त्यामुळे काहींनी रास्ता रोको केला. ज्यांनी जाणीवपूर्वक वीजपुरवठा खंडित केला आणि कुठला वीजपुरवठा खंडित करायचा हे ज्ञान आहे अशाच लोकांनी ते कृत्य केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी डीसीपी प्रशांत मोहिते यांच्यासोबतच्या बैठकीत केली आहे. आता संप मिटला आहे, मात्र कुणी विनाकारण वीजपुरवठा बंद केला तर आम्हाला कळवा, आमचे भाजप पदाधिकारी निश्चितच या संदर्भात पाठपुरावा करतील. नागरिकांना त्रास झाला आहे, त्याच्यावर ईलाज झाला पाहिजे आणि पुन्हा अशा पद्धतीने मनमर्जी करत नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने या प्रकरणातील दोषींना शासन करावे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांशी साधला संपर्क

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या आकस्मिक संपामुळे पनवेल शहर आणि परिसरात वीजपुरवठा ठप्प होऊन नागरिकांसमोर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती. या गंभीर परिस्थितीवर तातडीने मार्ग निघावा यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून पनवेलमधील वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी आवश्यक ती तातडीची पावले उचलण्याची विनंती केली. याची दखल मुख्यमंत्र्यांनी घेत संबंधित विभागांना निर्देश दिले. त्यानंतर काही वेळातच संप मिटून वीजपुरवठा पूर्ववत झाला.

## विमानतळ नामकरणात जनभावनांचा विचार करूनच निर्णय -उपमुख्यमंत्री पवार



**पुणे : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी सातत्याने होत आहे. या संदर्भात बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील जनतेच्या भावनांचा विचार करूनच निर्णय घेतला जाईल, असे म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री पवार शुक्रवारी (दि.१०) पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी त्यांना नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना ते म्हणाले की, स्वतः मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात शिष्टमंडळाशी चर्चा केली आहे. लोकहितातून जेव्हा एखादी मागणी पुढे येते, तिचा विचार सरकार करते. जनतेच्या भावना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे त्यांच्या भावनांचा आदर राखूनच विमानतळाला नाव देण्याचा निर्णय होईल.

## ‘उद्धव ठाकरे यांना मोर्चा काढण्याचा अधिकार आहे का?’

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना असे नुकसान जेव्हा झाले होते त्या वेळेस त्यांनी किती पैसे दिले, हे बघितले तर त्यांना मोर्चा काढण्याचा अधिकार आहे का, असा प्रश्न निर्माण होईल. ते मोर्चा काढतात, कारण त्यांना पक्षाला जिवंत ठेवायचे आहे, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी (दि. ११) हंबरडा मोर्चा काढण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांनी स्वतःला आरशात पहावे. त्यानंतर ते मोर्चे काढणार नाही, असे ते म्हणाले.

## निवडक

### शांततेचा नोबल पुरस्कार मारिया मच्याडो यांना जाहीर

**ओस्लो :** सन २०२५चा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या पुरस्कारासाठी दावा केला होता, मात्र व्हेनेझुएलामध्ये नागरिकांच्या लोकशाही हक्कांचे रक्षण आणि देशाची वाटचाल शांततेत व्हावी यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मच्याडो यांची या पुरस्कारासाठी नॉर्वेच्या नोबेल समितीने निवड केली आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस आणि राज ठाकरे आज एका मंचावर

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे पुन्हा शनिवारी (दि. ११) एकत्र दिसणार आहेत. महेश मांजरेकर लिखित व दिग्दर्शित 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' सिनेमा ३१ ऑक्टोबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या सिनेमाचा ट्रेलर शनिवारी संध्याकाळी ५ वाजता लोअर परळ येथील फिनिक्स पलेडिअममध्ये प्रदर्शित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज एका व्यासपीठावर उपस्थिती दर्शवणार आहेत.

# पुण्यात एटीएसची मोठी कारवाई

## टेरर फंडिंग नेटवर्कशी संबंधित १८ जण ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) पुणे शहरात धडक कारवाई करत टेरर फंडिंग नेटवर्कशी संबंधित १८ जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे दहशतवादी नेटवर्कमध्ये केवळ गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोकच नव्हे, तर उच्चशिक्षित व्यक्ती, आयटी अभियंते, बँक कर्मचारी आणि ठेकेदार यांसारख्या समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे.

या संपूर्ण प्रकरणाच्या तपासाची सुरुवात २०२३मध्ये कोथरूड परिसरात घडलेल्या एका बाईक चोरीच्या घटनेतून झाली होती. त्या प्रकरणातील काही आरोपींच्या चौकशीतून हडपसर येथील नोबेल हॉस्पिटलमध्ये कार्यरत एका डॉक्टरचे नाव समोर आले. या डॉक्टरचे थेट संबंध काही दहशतवादी संघटनांशी जोडलेले

### उच्चशिक्षितांचा समावेश

असल्याचे तपासात उघड झाले. या माहितीच्या आधारावर एटीएसने कोंढवा परिसरातील नेटवर्कचा उलगडा केला, जिथून अनेक व्यक्ती या डॉक्टरच्या संपर्कात असल्याचे स्पष्ट झाले.

टेरर फंडिंगसाठी काम करणाऱ्या या संपूर्ण नेटवर्कवर एटीएसने तब्बल एक वर्ष गुप्तपणे नजर ठेवली होती. या काळात तपास यंत्रणांनी निधी संकलनाचे व्यवहार, बँक व्यवहार, डिजिटल पुरावे आणि सोशल मीडियावरील संवाद यांचा सखोल तपास केला. या तपासामुळे नेटवर्कचे राज्याबाहेरील आणि परदेशी घटकांशी असलेले संबंध समजण्यास महत्त्वपूर्ण मदत मिळाली.

एटीएसने कारवाईदरम्यान पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी छापे टाकले. यात कोंढवा, खडक, खडकी, वानवडी आणि पिंपरी-चिंचवडमधील बोहरा हाऊस यांसारख्या परिसरांचा समावेश आहे. या ठिकाणांहून संशयितांची हालचाल, बैठका आणि टेरर फंडिंगशी संबंधित आर्थिक व्यवहारांचे महत्त्वाचे पुरावे जप्त करण्यात आले आहेत.

तपासात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. साताऱ्यातील एका दुकानातून लष्करी साहित्य खरेदीसाठी नऊ लाख रुपये इतक्या रकमेचा व्यवहार करण्यात आला होता. या खरेदीचा थेट संबंध टेरर फंडिंग नेटवर्कशी असल्याचे एटीएसने प्राथमिक तपासात स्पष्ट केले आहे.

एटीएस आता या नेटवर्कचा राज्याबाहेरील आणि परदेशी घटकांशी असलेला संबंध अधिक तपासत आहे.

# लाचखोरीच्या प्रकरणात पोलिसालाच अटक

## रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल न करण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच मागणाऱ्या पोलिसाला रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि.१०) जेरबंद केले. विशाल वाघाटे असे अटक करण्यात आलेल्या पोलिसाचे नाव आहे.

३० वर्षीय तक्रारदाराविरोधात पोक्सो कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. या गुन्ह्यात मदत करण्यासाठी तसेच पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा न दाखल करण्यासाठी अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात नेमणूक असलेल्या विशाल वाघाटे यांनी तक्रारदाराकडे पाच लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे ८ ऑक्टोबरला प्राप्त झाली. ९ ऑक्टोबरला या तक्रारीची पडताळणी करण्यात आली, ज्यात आरोपी पोलीस वाघाटे यांनी लाचेची मागणी केल्याचे आणि पहिल्या हप्त्यात तीन लाख रुपये स्वीकारण्याचे कबूल केल्याचे समोर आले.

यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावला आणि शुक्रवारी सकाळी तीन लाख रुपयांची लाच घेताना वाघाटे यांना रंगेहाथ पकडले. महाड शहर पोलीस ठाण्यात याबाबतचा



गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू असल्याची माहिती रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रमुख पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांनी दिली.

या कारवाईत पोलीस निरीक्षक निशांत धनवडे, नारायण सरोदे, सहाय्यक फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, सुषमा राऊळ, हवालदार महेश पाटील, सुमित पाटील, परम ठाकूर, सिचन आटपाडकर, शिपाई मोनाली पाटील, अनंत घरत, सागर पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

दरम्यान, रायगड जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात अधिकारी, कर्मचारी अथवा त्यांचे एजंट लाचेची मागणी करीत असल्यास तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी ०२१४१-२२२३३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांनी केले आहे.

# मान्सूनच्या परतीचा प्रवास अखेर सुरू

**पुणे : प्रतिनिधी**

गेल्या दोन महिन्यांपासून राज्यभरात विशेषतः मराठवाड्यात पावसाने पूर परिस्थिती निर्माण केली. नंतर अरबी समुद्रात ‘शक्ती’ चक्रीवादळ सक्रिय झाल्याने पावसाने ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मुक्काम वाढवला. आता राज्यातून मान्सून परतण्यास सुरुवात झाली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार पुढील दोन ते तीन दिवसात राज्यभरातून मान्सूनचा परतीचा प्रवास पार पडेल. मान्सूनच्या परतीची रेषा अलिबाग, अहिल्यानगर, अकोला, जबलपूर, वाराणसी आणि रक्सौल या मार्गांमधून जात आहे. म्हणजेच राज्यातील विविध भागातून हळूहळू मान्सून माघारी फिरेल अशी



शक्यता आहे.

मुंबईसह कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातून मान्सूनचा पाऊस हळूहळू कमी होत असल्याचे दिसून आले आहे. हवामान तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार मान्सूनच्या परतीच्या या प्रवासामुळे काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस अजूनही होऊ शकतो, परंतु एकूणच राज्यात हवामान उबदार आणि आर्द्रता कमी होण्यास सुरुवात होईल. हवामान विभागाच्या अंदाजानुसार गेल्या आठवड्यात तयार झालेल्या शक्ती चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली आहे. त्यामुळे कमी दाबाचा पट्टा विरला आहे.

यंदा ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या मुसळधार पावसाने आणि त्यानंतर बंगालच्या उपसागरात झालेला कमी दाबाचा पट्टा, मग अरबी समुद्रात तयार झालेले शक्ती चक्रीवादळ यामुळे मान्सूनच्या परतीचा प्रवास लांबला होता. आता हवामान विभागाने परतीचा पाऊस सुरू होत आहे.

### तापमानात वाढ

पुढील दोन ते तीन दिवसात राज्यातून मान्सून माघारी फिरेल अशी शक्यता आहे. पुढील पाच दिवस राज्यभरात कोणत्याही जिल्ह्यात पावसाचे अलर्ट देण्यात आलेले नाहीत. प्रादेशिक हवामान केंद्राच्या अंदाजानुसार पुढील ४८ तासात कमाल तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ होणार आहे. त्याचा परिणाम शुक्रवारीच (दि.१०) दिसू लागला असून उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत.

# धकाधकीच्या जीवनात आरोग्याची काळजी घेणे महत्त्वपूर्ण -माजी सभागृह नेते परेश ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची काळजी घेणे महत्त्वपूर्ण झाले आहे, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सायकल साहस मोहिमेच्या शुभारंभावेळी केले.

आरोग्य, निसर्ग संवर्धन आणि इंधन बचतीबाबत जनजागृती करण्यासाठी राजकिशोरी लांगे यांच्या वतीने पनवेल ते दुर्गराज रायगड सायकल मोहीम १० व ११ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेचा शुभारंभ पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आला. या वेळी त्यांनीही सायकलिंग करून मोहिमेत सहभाग घेतला आणि या मोहिमेमुळे इतरांनाही आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रेरणा मिळेल, असे नमूद केले.

### पनवेल ते दुर्गराज रायगड सायकल मोहीम

या मोहिमेवेळी राजकिशोरी लांडगे, राजेश देशपांडे, रंगनाथ मुगळिहाळ, विवेक आपटे, सोनल भोमे, अमोल समुद्र, चंद्रशेखर कमल, विष्णू जगताप, मंगल भानुशाली, भुजंग लोखंडे, लक्ष्मण नलावडे आदी उपस्थित होते.

# कंपनीची मुजोरी ऐकून घेतली जाणार नाही खासदार धैर्यशील पाटील यांचा सज्जड दम

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हेटवणे धरणाचे पाणी नवी मुंबईला जास्त प्रवाहने घेऊन जाण्यासाठी सिडकोच्या माध्यमातून मेघा इंजिनियर कंपनीद्वारे जिते आणि बेलवडे याठिकाणी जलबोगद्याचे काम सुरू आहे या कामामुळे मुंगोशी गावाला दूषित पाणी पुरवठा होत असल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले असून याबाबत प्रांताधिकारी कार्यालय येथे खासदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला खासदार धैर्यशील पाटील, प्रांताधिकारी प्रवीण पवार, जिप.माजी सभापती डी.बी. पाटील, सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे, बेलवडे सरपंच हरेश पाटील, सिडकोचे अधिकारी मेघा इंजिनियर कंपनीचे अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक



विक्रम नवरखेडे आदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी दूषित पाण्यासंदर्भात आवाज उठून अनेकदा सदर कंपनीला सांगितले आहे मात्र याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असून याबाबत दोन दिवसांपूर्वी महिला विचारणा करण्यासाठी कंपनी गेट जवळ गेले असता येथील मोहन पाटील व सुभाष पाटील यांनी जिते येथील चार पाच गावगुंडांना बोलावून महिलांबरोबर धक्काबुक्की केली याची तक्रार पोलिसांत केली आहे. घटना ही निंदनीय असून कंपनीची मुजोरी येथील स्थानिक ऐकून घेणार नाही अशा पद्धतीचे कोणी गुंड येऊन महिलांना दमबाजी अथवा मारहाण करत असेल तर त्यांच्यावरती तात्काळ गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे.व आशा गावगुंडांना वेळीच जरब देणे आवश्यक आहे.

**मुंगोशी ग्रामस्थांकडून करण्यात आलेल्या मागण्या बाबत सकारात्मक विचार करून गावाला स्वच्छ पाणीपुरवठा येथील सिक्युरिटीवरील दोन व्यक्ती हलविण्यात येईल तसेच प्रत्येक घरात स्वच्छ पाणी पुरवठ्याचे जार पोचविण्यात येतील यासह इतर मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत.**
**–पी. अरूण, अधिकारी, मेघा इंजिनियर कंपनी**

**कंपनीचा येणारा दूषित पाणी याबाबत ग्रामस्थांची तक्रार होती नुसार आज बैठक झाली त्यात त्यांच्या गावाच्या विहिरीच्या पुढे जावून हा पाणी सोडला जाईल आणि तोपर्यंत येथील ग्रामस्थांना फिल्टर प्लांटचे पाणी दिले जाणार आहे.**
**–राजेंद्र पोतदार, सिडको अधिकारी**

## माणगावमध्ये दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

**माणगाव :** माणगाव शहरातील प्रसिद्ध अशा राठोड हॉस्पीटल आणि धनलक्ष्मी मेडिकलचे मालक परेश मोहनलाल राठोड यांचे मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री १० सुमारास माणगाव बाजारपेठेतील मोतीराम प्लाझा समोर मुंबई गोवा महामार्गावर दुचाकीवरून जात असताना अपघात झाला.

या अपघातानंतर त्यांना माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर उपचार सुरू असतानाच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

परेश राठोड हे अत्यंत मनमिळाऊ आणि शांत संयमी स्वभावाचे होते. त्यांनी अनेक गरीब आणि गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ दिला होता. त्यामुळे ते संपूर्ण तालुक्यात परीचीत होते. अंत्ययात्रेला मोठ्या संख्येने मित्र परिवार उपस्थित होता.

## महाडमधील रूपवलीत सोन्याच्या दागिन्यांचा चोरी : दोघे अटकेत

**महाड :** महाड तालुक्यातील रुपवली गावातील दिड लाख किमतीच्या सोन्याच्या दागिन्याच्या चोरी प्रकरणात आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात महाड औद्योगिक वसाहतीच्या पोलिसांना यश आले

जितेश सुधाकर पालकर यांच्या घरातून सुमारे दीड लाख किमतीचे सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाली होती. या चोरीची माहिती पालकर यांनी महाड औद्योगिक वसाहतीच्या पोलिसांना दिली.पोलिसांनी या चोरीच्या तपासाची सूत्रे वेगाने फिरवत दोन संशयित चोरांना ताब्यात घेतले. त्यांची नावे रूपेश कदम आणि मनोहर दुधाणे दोघेही राहणार रुपवली ता महाड, असे असून त्यांनी संबंधित चोरी केल्याची कबुली महाड औद्योगिक वसाहतीच्या पोलिसांजवळ दिल्याची माहिती पोलिसांनी दिली

## गांजा वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक; तीन दिवसांची पोलीस कोठडी

**खालापूर :** मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील घोडवली फाटा येथील पेट्रोल पंपाजवळ १ किलो.८३ ग्रॅम वजनाजा १ लाख २० हजार रुपये किमतीचा गांजा २ तरुण स्कुटी वरून वाहुन नेत असता खालापूर पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग अलीबाग यांच्या पथकाने ताब्यात घेतले या दोघांना खालापूर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना १३ ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली. विवेक यशवंत गायकवाड रा खोपोली व सुदर्शन सावंत रा खोपोली असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

## अनधिकृत विक्रेत्यांना वाहन पुरविणाऱ्या विक्रेत्यांचे ट्रेड प्रमाणपत्र रद्द केले जाणार


**मुंबई : प्रतिपनिधी**

राज्यभरातील अनाधिकृत विक्रेत्यांना (मल्टी ब्रँड आउटलेट) विक्रीसाठी वाहन पुरवणाऱ्या अधिकृत वाहन विक्रेत्यांचे ' ट्रेड प्रमाणपत्र ' रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन आयुक्तांना दिले. ते ऑटोमोबाईल डीलर्स फेडरेशनच्या बैठकीमध्ये बोलत होते. या बैठकीला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सह सचिव (परिवहन) राजेंद्र होळकर, ऑटोमोबाईल डीलर्स फेडरेशनचे अध्यक्ष सचिन महाजन यांच्या सह राज्यभरातील इतर पदाधिकारी उपस्थित होते.

'मल्टी ब्रँड आउटलेट 'सारख्या अनधिकृत वाहन विक्रेत्यांची राज्यभरात प्रचंड साखळी निर्माण झालेली आहे. राज्य शासनाला कोणत्याही प्रकारचा महसूल न देता हे अनाधिकृत वाहन विक्री करीत असतात. राज्यात इतर विभागातून तसेच परराज्यातून नवीन वाहने आणून ' ट्रेड प्रमाणपत्र ' नसताना अनाधिकृतरित्या वाहन विक्री करतात . भविष्यात अशा अनाधिकृत विक्रेत्यांना वाहन पुरविणाऱ्या अधिकृत वाहने विक्रेत्यांचे ट्रेड प्रमाणपत्र रद्द करण्यात यावेत. असे निर्देश परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी परिवहन आयुक्तांना दिले.

या बैठकीमध्ये टोमोबाईल डीलर्स फेडरेशनच्या विविध मागण्यांच्या वर चर्चा झाली. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की कायद्याच्या कक्षेत राहून व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे राहिले!

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी टोमोबाईल डीलर्स फेडरेशने त्यांच्या सीएसआर फंडातून राज्यभरातील महत्वाच्या एसटी बसस्थानकावर स्तनदा मातांसाठी प्रसाधनगृहाच्या सोयीसह ' हिरकणी कक्ष ' उभे करावेत, असे आवाहन केले. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत टोमोबाईल डीलर्स फेडरेशने पहिल्या टप्प्यात ५१ बसस्थानकावर ' हिरकणी कक्ष ' उभारुन देण्याची ग्वाही दिली.



**कर्जत : माजी आमदार तथा भाजपचे ज्येष्ठ नेते सुरेश लाड यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या वेळी त्यांना जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य सभापती नरेश पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती मनोहर थोरवे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, ज्येष्ठ नेते वसंत भोईर, तानाजी चव्हाण यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## मोटरसायकल चोरीप्रकरणी बाल गुन्हेगारावर गुन्हा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोस्ट ऑफिस समोरील मन सरोज प्लाझा हौसिंग सोसायटी या इमारतीच्या खाली पार्किंगच्या जागेत उभी करून ठेवलेली मोटारसायकल चोरलेल्या साडेसोळा वर्षीय बाल गुन्हेगारा विरोधात नागोठणे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या अन्य मोटारसायकलच्या चोऱ्यांसह इतर छोट्या मोठ्या चोरीच्या घटनांमध्ये या बाल गुन्हेगाराचा सहभाग असल्याची शक्यता निर्माण झाल्याने नागोठणे पोलिस यंत्रणा कार्यान्वित झाली आहे.

यासंदर्भात नागोठणे पोलिस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार नागोठणे पोस्ट ऑफिस समोरील मन सरोज प्लाझा या इमारतीत राहणारे ड. महेश पवार यांनी आपली हिरो होंडा पॅशन (क्र. एम.एच.०६ यु ४३६६) ही सुमारे ५१ हजार रुपये किंमतीची मोटारसायकल इमारतीच्या खालील पार्किंगच्या जागेत नेहमीप्रमाणे उभी करून ठेवली होती. बुधवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.४५ वाजण्याच्या सुमारास कामानिमित्त बाहेर जाण्यासाठी ड. महेश पवार आपली मोटारसायकल घेण्यासाठी गेले असता त्या ठिकाणी त्यांना आपली मोटारसायकल आढळून आले नाही. त्यांनी इमारतीच्या आजुबाजूला, तसेच एस. टी. बस स्थानक, रेल्वे स्थानक आणि परिसरात दिवसभर आपल्या मोटारसायकलचा शोध घेतला असता त्यांना मोटारसायकल सापडली नाही. त्यामुळे कुणीतरी अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरल्याची खात्री झाल्याने ड. महेश पवार यांनी नागोठणे पोलिस ठाण्यात ८ ऑक्टोबर रोजी रात्री ९.५८ वाजण्याच्या सुमारास मोटारसायकल चोरीला गेल्याची फिर्याद दिली.


दरम्यान गुरुवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हवा. महेश रुईकर, पो. शि. विक्रांत बांधणकर यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरवून नागोठण्यातील महामार्गालगत असलेल्या रामनगर येथे जाऊन तेथील साडेसोळा वर्षीय संशयित बाल आरोपी यास नागोठणे पोलिस ठाण्यात घेऊन येण्यास त्याच्या आईला सांगितले. त्यानुसार या बाल आरोपीकडे पोलिसांनी त्याच्या आई समक्ष चौकशी केली असता त्याने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. बाल आरोपीने दिलेल्या माहितीनुसार चोरीला गेलेली मोटारसायकल पोलिसांनी मोटारसायकल टाकलेल्या ठिकाणी पंचनामा करून ताब्यात घेतली आहे. याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये बाल गुन्हेगाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भविष्यात मोठा होऊन अट्टल गुन्हेगार होण्या आधीच नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा. महेश रुईकर व पो. शि . विक्रांत बांधणकर यांनी अवघ्या बारा तासांत गुन्ह्याचा तपास करून आरोपी विरोधात गुन्हा दाखल केल्याने या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या प्रकरणी पुढील तपास सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा. महेश रुईकर हे करीत आहेत. दरम्यान नागरिकांनी जागरूकता दाखवून घटनेची माहिती लागलीच पोलिस यंत्रणेला देऊन सहकार्य करण्याचे आवाहन नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी केले आहे

## ‘शेतकरी बांधवानी फळपीक विमा योजनेचा लाभ घ्यावा’

**पोलादपूर : प्रतिनिधी**

१ ऑक्टोंबर २०२५ पासून महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना चालू वर्षासाठी (आंबिया बहार) सुरु करण्यात आली आहे. आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून आंबा व काजु फळबागा असणाऱ्या शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेव न आवश्यक कागदपत्रांसहित आपल्या फळबागांचा विमा उतरवून घ्यावा, असे आवाहन पोलादपूर तालुका कृषि अधिकारी वैशाली फडतरे यांनी केले आहे.



फळपिकांमधून मिळणाऱ्या उत्पादनाला बाजारमूल्य अधिक असल्याने शेतकरी यांना फळबागांच्या माध्यमातून चांगले उत्पादन मिळत असते. मात्र फळपिकांचे अपेक्षित उत्पादन न आल्यास शेतकरी यांना मोठ्या तोटयाला सामोरे जावे लागते, ही बाब विचारात घेवून चालू वर्षीही राज्य शासनाने पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना दि. १२ जुन २०२४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे रायगड जिल्हयासाठी युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्सूरन्स कंपनी, या विमा कंपनीच्या माध्यमातून राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकऱ्यांच्या फळपिकांना संभाव्य हवामान धोक्यांपासून विमा संरक्षण दिल्यास शेतकरी यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहण्यास मदत होणार आहे. पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना रायगड जिल्ह्यामध्ये आंबिया बहार साठी आंबा व काजु फळपिकांना महसूल मंडळ हा घटक ग्रहीत धरुन लागू करणेत आली आहे.

फळपिक विमा योजना ही कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी यांचेसाठी ऐच्छिक योजना आहे. शेतकरी यांचेसाठी आंबा फळपिकासाठी ४२ टक्के तर काजु फळपिकासाठी १५ टक्के विमा हप्ता दर निश्चित करणेत आला आहे. फळपिक विमा योजनेत सहभागी होणेसाठी कमीत कमी ०.१० हेक्टर क्षेत्र तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही ४ हेक्टर अशी आहे. तसेच विमा संरक्षणाचे कवच फक्त उत्पादनक्षम फळबागांसाठीच आहे याची नोंद शेतकरी यांनी घेतली पाहिजे. योजनेत समाविष्ठ आंबा व काजु फळबागांचे वय कमीत कमी ५ वर्षे असावे ही अट आहे.

विमा संरक्षण बाबीमध्ये आंबा फळबागांसाठी हवामान धोक्याअंतर्गत कालावधी २ डिसेंबर ते ३१ मे असा असून त्यामध्ये अवेळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान, वेगाचा वारा तसेच गारपिठ या हवामान धोक्यांचा समावेश आहे. काजु फळबागांसाठी हवामान धोक्याअंतर्गत कालावधी १ डिसेंबर ते ३० एप्रिल असा असून त्यामध्ये अवेळी पाऊस, कमी तापमान व गारपीट या हवामान धोक्यांचा समावेश आहे. या समाविष्ठ कालावधी मध्ये येणाऱ्या हवामान धोक्यापासून योजनांतर्गत फळबागांना विमा संरक्षण कवच प्राप्त होणार आहे. फळपिक विमा योजनेमध्ये आंबा या फळपिकासाठी हेक्टरी १ लाख ७० हजार रु. विमा संरक्षण (गारपीट वगळून) असून हेक्टरी १४ हजार ४५० रु. विमा हप्ता आहे. काजु फळपिकासाठी हेक्टरी १ लाख २० हजार रु. विमा संरक्षण (गारपीट वगळून) असून हेक्टरी ६ हजार रु. विमा हप्ता आहे.

शेतकरी यांना फळपीक विमा योजनेत समाविष्ठ होणेसाठी शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आय. डी. एग्रीस्ट्रॉक नंबर ) असणे तसेच आपल्या फळबागांची ई–पिक पहाणी पूर्ण असणे अनिवार्य आहे. या शिवाय शेतकरी यांना विमा योजनेत सहभागी होता येणार नाही. शेतकरी यांच्या शेताचा अदयावत ८अ व ७/१२ उतारा, आधारकार्ड, बँक पासबुक तसेच स्वयंघोषणापत्र ही सर्व कागदपत्रे फळपिक विमा योजनेत सहभागी होणेसाठी आवश्यक आहेत.

पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेमध्ये सहभागी होणेसाठी शेतकरी यांनी सीएससी सेंटर तसेच आपले सरकार सेवा केंद्र, शेतकऱ्यांचे ज्या बँकेमध्ये खाते आहे–त्या बँकेमार्फत, विमा कंपनीचे विमा प्रतिनिधी, शेतकरी स्वतः https://pmfby.gov.in या वेब लिंकवर जावून फळपिक विमा योजनेमध्ये समावेश होण साठी अर्ज करु शकतात.

पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना अंतर्गत आंबा व काजु फळपिकांसाठी बुधवार दि. १ ऑक्टोंबर २०२५ रोजी अर्ज भरणे चालू झाले असून योजनेमध्ये समाविष्ठ होणेसाठी ३० नोव्हेंबर २०२५ ही अंतिम मुदत असेल ही बाब शेतकरी बांधवांनी लक्षात घावी.

## श्रीवर्धन तालुक्यात शिक्षणाचे ‘प्रभारी’ राज्य!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात गटशिक्षणाधिकारी या अत्यंत महत्त्वाच्या पदावर गेल्या अनेक महिन्यांपासून कायमस्वरूपी अधिकारी नेमण्यात आलेले नाहीत. परिणामी तालुक्याच्या प्राथमिक शिक्षण व्यवस्थेवर आणि शैक्षणिक उपक्रमांवर परिणाम होऊ लागला आहे. सध्या या पदाचा अतिरिक्त कार्यभार अलिबाग येथील गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्याकडे आहे. त्यांच्याकडे श्रीवर्धनसोबत म्हसळा तालुक्याचाही कार्यभार असल्याने दोन्ही ठिकाणी शिक्षणविषयक निर्णयांमध्ये विलंब, समन्वयाचा अभाव आणि व्यवस्थापनातील गोंधळ निर्माण होत आहे.

शिक्षण विभागाकडून दरवर्षी लाखो रुपयांचे अनुदान, पोषण आहारासाठी निधी, शालेय साहित्य, गणवेश यासाठी मोठा खर्च केला जातो. मात्र, या सर्व अंमलबजावणीवर देखरेख ठेवणारा जबाबदार अधिकारीच कायमस्वरूपी नाही,



ही परिस्थिती चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, विद्यार्थ्यांची घटलेली उपस्थिती आणि शैक्षणिक दर्जातील असमानता यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गटशिक्षणाधिकारीची उपस्थिती अत्यावश्यक असते.

गटशिक्षणाधिकारी हे तालुक्यातील सर्व शासकीय, जिल्हा परिषद व काही माध्यमिक शाळांचे नियंत्रण पाहतात. त्यांच्याकडून शिक्षकांच्या बदल्या, प्रशासकीय परवानग्या, प्रशिक्षण, शैक्षणिक स्पर्धा, तसेच शाळा तपासणी यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पडतात. परंतु सध्या प्रभारी अधिकाऱ्यांना दोन तालुक्यांचा ताण असल्याने श्रीवर्धनमधील अनेक शैक्षणिक उपक्रम वेळेवर राबवले जात नाहीत. शिक्षकांमध्ये संवाद कमी झाला असून निर्णयप्रक्रिया संथ झाली आहे.

पालक व स्थानिक शिक्षणप्रेमी नागरिकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे कायम गटशिक्षणाधिकारी नेमण्याची मागणी केली आहे. शिक्षणावर शासन करोडो रुपये खर्च करते, पण व्यवस्थापनच प्रभारीवर चालते, हे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे, अशी भावना पालक व्यक्त करत आहेत.

श्रीवर्धनसारख्या शैक्षणिक दृष्ट्या समृद्ध तालुक्यात आजही गटशिक्षणाधिकारी पद कायमस्वरूपी भरलेले नाही, ही शासनाच्या शिक्षणविषयक धोरणातील गंभीर त्रुटी असल्याचे शिक्षक संघटनांचे मत आहे.

## सीए पदाकरिता अर्जाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधी अंतर्गत घटक पोलीस कल्याण निधी रायगड व त्याअंतर्गत चालणारे उपक्रम (पोलीस कॅन्टीन, वेल्फेअर पेट्रोलपंप) यांची वार्षिक तपासणी करण्याच्या अनुषंगाने चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांची नेमणूक करावयाचे प्रयोजन असून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून इच्छूक खाजगी चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छूक खाजगी चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड–अलिबाग यांच्याकडे अर्ज करावेत, असे आवाहन आहे.

# पनवेल मनपाच्या नऊ कर्मचाऱ्यांना पदावनती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या नऊ कर्मचाऱ्यांची पदावनती करण्यात आली असून त्याबाबतचा आदेश जाहीर झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग अधिसूचनेचा आधार घेऊन, पनवेल महानगरपालिकेने २१ जून २०२१ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार ही कारवाई केली आहे.

महानगरपालिकेतील वरिष्ठ लिपिक या पदासाठीच्या यादीत सात कर्मचारी पूर्वी कार्यरत होते, मात्र शासन निर्याणा नुसार त्यांच्या नियुक्ती व ज्येष्ठता प्रक्रियेत झालेल्या पुनर्रचनेतून काही तांत्रिक कारणांमुळे त्यांची पदावनती करण्यात आली आहे.

या आदेशानुसार पालिकेतील एकूण नऊ कर्मचाऱ्यांची पदावनती निश्चित करण्यात आली आहे, त्या पैकी सात कर्मचारी यांना वरिष्ठ लिपिक पदावरून लिपिक (कनिष्ठ) या पदावर पदावनती देण्यात आली आहे. तर उर्वरित दोन कर्मचाऱ्यांना स्वच्छता निरीक्षक पदी पदानवती देण्यात आली आहे. संबंधित आदेश शासन निर्णयाच्या अधीन असून, प्रशासनाने ही कारवाई सेवा नोंदवहीत नोंदविली आहे.या पदावनतीचा परिणाम संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीवरही होणार असून, त्यांच्या सेवाश्रेय व निवृत्ती दिनांकातही त्यानुसार बदल होणार आहे. दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे, प्रशासनाच्या तपासणीत काही त्रुटी आढळल्याने आणि नियुक्ती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही पदावनती प्रक्रिया शासन नियमांनुसार पार पाडली गेली असून, कर्मचाऱ्यांना याबाबत लेखी आदेशही देण्यात आले आहेत. मात्र या निर्णयामुळे काही कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, पनवेल महानगरपालिकेच्या प्रशासनातील ही कारवाई सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

## इक्बाल काझी यांच्या वतीने विविध शाळांना १७ लाखांची मदत

**पनवेल : वार्ताहर**

पनवले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल काझी यांनी संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या याकुब बेग हायस्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज पनवेल आणि बारापाडा अँग्लो उर्दू हायस्कुल यांना विविध कामासाठी रक्कम रूपये सतरा लाखांचा धनादेश दिला आहे.

इक्बाल काझी यांनी याआधीही ३३ लाखांचा धनादेश दिला होता. इक्बाल काझी हे नेहमी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करतात. त्याचा हेतू असा आहे की, कोणताही विद्यार्थी पैशाच्या अभावी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि शाळेमध्ये घरासारखे वातावरण मिळावे म्हणुन ते मदत करीत असतात.





**पनवेल : पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ज्योती केणी यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देत ज्योती केणी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते संजय पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आंनद ढवळे, महेश पाटील, चंद्रकांत पोपेटा, अशोक पाटील, पांडुरंग केणी, पांडुरंग सीताराम केणी, आत्माराम पाटील, परशुराम पाटील, सुरेश पाटील, बाबुराव पोपेटा, कमलाकर केणी, प्रमोद भगत, मनोहर केणी, अनंता केणी, जयेंद्र केणी, श्रीराम केणी, अॅड. रवींद्र केणी, ग्रामपंचायत सदस्य पूनम भगत, आशा केणी, जनाबाई पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# सीकेटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची 'एनआयएसएम'ला शैक्षणिक भेट




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या वतीने पाताळगंगा रसायनी मधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सला (एनआयएसएम) शैक्षणिक भेट देण्यात आली.

वर्ल्ड इन्व्हेस्टर वीक २०२५ च्या निमित्ताने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (एनआयएसएम) यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एक माहितीपूर्ण शैक्षणिक सहल आयोजित केली होती. या कार्यक्रमाचा उद्देश आर्थिक साक्षरता, सायबर फसवणूक प्रतिबंध आणि गुंतवणूकदार संरक्षण यासंदर्भात तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता. बी.एस्सी. इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग आणि बी.एस्सी. इन सायबरसिक्युरिटी अँड डिजिटल फॉरेन्सिक या अभ्यासक्रमातील एकूण १०२ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दिवसाची सुरुवात बी.एस.ई.च्या मुख्य नियामक अधिकारी कमला कंठराज यांच्या अभ्यासपूर्ण तज्ञ उद्योग सत्राने झाली. त्यांनी नैतिक बाजार व्यवहार आणि नियामक अनुपालनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर सायबर फसवणूक प्रतिबंध आणि जबाबदारीपूर्ण डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरावर आधारित एक प्रभावी नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. मुख्य आकर्षण होते एनआयएसएम शार्क टँक स्पर्धा, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या उद्योजकीय आणि तांत्रिक कौशल्यांचे प्रदर्शन केले. सहभागी पाच महाविद्यालयांपैकी सी. के. टी. कॉलेजच्या टीमने त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेच्या कार्यरत प्रोटोटाइपसाठी विशेष उल्लेख मिळवला.

या टीममध्ये अंकित शर्मा, प्रेम मोकाशी, निलजा मुंढे आणि विधी म्हात्रे (प्रथम वर्ष, बी.एस्सी. सायबरसिक्युरिटी अँड डिजिटल फॉरेन्सिक) यांचा समावेश होता. त्यांनी इनव्हॉईसी प्रो हे स्मार्ट, वेब-आधारित जीएसटी बिलिंग प्लॅटफॉर्म सादर केले. हे सोल्युशन लघु व्यावसायिक आणि फ्रीलान्सर यांच्यासाठी अनुपालन व स्वयंचलन सुलभ करण्याचे उद्दिष्ट बाळगते. हे दर्शवते की विद्यार्थी कसे त्यांच्या वर्गातील शिक्षणाचा वापर करून असंघटित क्षेत्रातील प्रत्यक्ष आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी उपाय शोधत आहेत.

या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांना डिजिटल फायनान्स, सायबरसिक्युरिटीचे उपयोग, आणि सिक्युरिटीज मार्केटमधील नियामक प्रणाली यांचे महत्त्वपूर्ण ज्ञान मिळाले. ही भेट शैक्षणिक ज्ञान आणि उद्योग व्यवहार यांच्यातील दुवा मजबूत आणि शिक्षण व उद्योग-संलग्न शिक्षण या बांधिलकीस अधोरेखित करणारी ठरली. शैक्षणिक सहलीचे आयोजन प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रा. सत्यजीत कांबळे, प्रशिक्षण व रोजगार अधिकारी आरती कागवाडे, समीर कांबळे (कोर्स कोऑर्डिनेटर), संध्या जवळे, श्रुती कोळी, आदित्य येवले आणि कौस्तुभ सोमण यांनी पार पडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.के.पाटील यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.



**पनवेल : डॉ. संतोष आगलावे यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुस्तक, तर भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी गुलाबाचे झाड भेट देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते.**



## अॅड. गोरक्ष लोखंडे यांची पनवेल महापालिकेस भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनुसूचित जाती संदर्भात असलेल्या विविध योजनांचे कामकाज समाधानकारक व उत्तम रीतीने सुरू असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य अॅड.गोरक्ष लोखंडे यांनी गुरूवारी केले. दिनांक ९ ऑक्टोबर रोजी महानगरपालिकेस भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

या भेटीदरम्यान शहरातील अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठी आरोग्य, वसाहत, आर्थिक दुर्बल घटकांचे घरे इत्यादी सुविधांचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी अॅड. गोरक्ष लोखंडे यांचे पुस्तक देऊन स्वागत केले. दरम्यान अॅड गोरक्ष लोखंडे यांनी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर भवन येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेत भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांची संवाद साधला. तसेच त्या ठिकाणी विद्यार्थ्यांचे असलेली व्यवस्था पाहून समाधान व्यक्त केले.

यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे,परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, प्रसेनजीत कार्लेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, अभिजीत पराडकर, नानासाहेब कामठे,मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखापरीक्षक निलेश नलावडे, महापालिका अधिकारी उपस्थित होते.

## एनएसएस ग्रामस्वच्छता अभियानाचा समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेबांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ग्राम स्वच्छता अभियानाचा समारोप समारंभ शुक्रवार दि १० ऑक्टोबर रोजी शांतीवन येथे झाला.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे उपस्थित होते. सदर मोहिमेत स्वयंसेवक म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या प्रणय कुरणे, मयुरेश माने,नंदिती वाघमारे, कशिश जाधव, प्रिया गावंड, ईश्वरी वाघमारे, दक्षता रिसबुड, विंधती चोकट (अकरावी कला) तर कुशल संघटक म्हणून साहिल खेत्रे व चैताली कदम (बारावी कला) यांना सन्मानित केले गेले.

मागील पाच दिवसात जी स्वच्छता मोहीम राबवली होती त्यावर आधारित घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यात अनुक्रमे हर्षदा रामधरणे, सृष्टी महाडिक,मयुरी कोळेकर, वैदही पाटील ,मंथन भोईर यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांचे कौतुक करताना समारंभाचे प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी व शिक्षक या नात्याचे महत्त्व उदाहरणाद्वारे विशद करून दिले तसेच आज तुम्ही ज्या पद्धतीने सामाजिक कार्यात सहभाग नोंदवला सहभाग यापुढेही घ्यावा असे आग्रही प्रतिपादन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैताली कदम व नंदीती वाघमारे यांनी केले. कार्यक्रम अधिकारी निखिलेश देशमुख, विवेक पाटील यांचे विशेष सहकार्य या अभियानास लाभले.कार्यक्रम अधिकारी गणेश पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.





**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जयचंद्रन वासू यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## चिरनेर महागणपती तीर्थक्षेत्री संकष्ट चतुर्थीच्या निमित्ताने गर्दी

**उरण :** तीर्थक्षेत्र चिरनेर येथे काल शुक्रवारी १० ऑक्टोबर रोजीच्या संकष्ट चतुर्थी निमित्ताने,भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच, गर्दी केली होती. उरण, पनवेल, पेण, नवीमुंबईसह मोठ्या संख्येने गणेश भक्त दाखल झाले होते. विशेषता छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय, परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती.

शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल,नारळ, हार, फुले व पापड, भाजीपाला विक्रेते, प्रसाद व पेढेवाले सुखावले होते. श्री महागणपती मंदिर परिसरात कंदमुळांसह रानातील इतर रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या,विक्री करतांना दिसून आल्या. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थान तर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.



**पनवेल : शहरातील रेखी हॉटेल आणि पटवर्धन हॉस्पिटलदरम्यान रात्री ट्रान्सफॉर्मला आग लागली होती. ही बाब समजताच माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी तातडीने महावितरणला निरोप दिला, मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. म्हणून घटनेचे गांभीर्य लक्षात घेत भोईर यांनी महापालिका अग्निशमन दलाला सांगून आग विझवली तसेच बेजबाबदार महावितरण अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.**

## संपादकीय


# सहकार्याचे नवे पर्व

गेल्या जुलै महिन्यात झालेल्या भारत–ब्रिटन मुक्त व्यापार कराराचे लाभ अधोरेखित करण्याच्या उद्देशाने तसेच त्यामुळे दृढ झालेल्या उभय देशांदरम्यानच्या संबंधांना आणखी वेग देण्यासाठी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर भारत दौऱ्यावर आले. ब्रिटनच्या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा हेतूही त्यांच्या भेटीमागे होता. भारतावर दीडशे वर्षे सत्ता गाजवणारा ब्रिटन हा देश उद्योग, तंत्रज्ञान व आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने भारताकडे आज सहकार्याचा हात पुढे करतो यातून जगाला भारताच्या क्षमतेविषयी निश्चितच सकारात्मक संदेश जातो.

**ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या भारत दौऱ्यात त्यांच्यासोबत जवळपास १२५ जणांचे ब्रिटिश शिष्टमंडळ होते. उद्योग व सांस्कृतिक क्षेत्रातील आघाडीची व्यक्तिमत्त्वे आणि विद्यापीठांचे कुलगुरू यांचा त्यात समावेश होता. उभय देशांतील व्यापारासंदर्भात बोलणी करण्यासाठी भारतात आलेले हे आतापर्यंतचे ब्रिटनचे सर्वात मोठे शिष्टमंडळ म्हणावे लागेल. भारताच्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे आज ब्रिटनसारखा देश भारताकडे भागीदार म्हणून पाहतो व स्वत:चे आर्थिक संतुलन परत कमावण्याकरिता भारताकडून सहकार्य अपेक्षितो. यातून भारताला पाश्चिमात्य बाजारपेठेमध्ये सुलभ प्रवेश मिळण्याचे मार्ग खुले होऊ शकतील. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर तसेच जगभरातील अन्य देशांवर लादलेले वाढीव आयातशुल्क व त्यांच्या रोजच्या नवनव्या उलटसुलट घोषणा यांचा विपरित परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला असून ती अतिशय अस्थिर झाली आहे. अशा परिस्थितीत ब्रिटन भारताकडे भागीदार म्हणून हात पुढे करतो आहे हे नव्या जागतिक व्यवस्थेतील भारताचे बदललेले स्थान अधोरेखित करणारे आहे. भारतासोबतचे व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध सुधारण्यासाठी प्रचंड संधी आहे असे प्रतिपादन स्टार्मर यांनी भारत दौऱ्यावर येण्याआधी केले होते. मात्र त्याचवेळेस भारतातून ब्रिटनमध्ये येणारे कामगार किंवा विद्यार्थ्यांसाठी व्हिसाचे नियम शिथिल करण्याची कोणतीही योजना नाही हेही स्पष्ट करायला ते विसरले नाहीत हेही लक्षात घेतले पाहिजे. ब्रिटनचे सरकारही देशात येणाऱ्या स्थलांतरितांची संख्या सध्या मर्यादित करू पाहते आहे. परंतु गुंतवणूक, व्यापार आणि तंत्रज्ञान या तिन्ही क्षेत्रांमध्ये मात्र उभय देशांमधील संबंध सहकार्याच्या दिशेने दृढ होताना दिसत आहेत. ब्रिटनच्या पंतप्रधानपदी आल्यानंतर स्टार्मर पहिल्यांदाच भारत दौऱ्यावर आले. स्टार्मर यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी देशाच्या आर्थिक राजधानीत म्हणजे मुंबईत भेट झाली. उभय देशांमधील संरक्षणविषयक व्यापाराच्या विकासाच्या दृष्टीने देखील स्टार्मर यांचा हा दौरा महत्त्वाचा होता. भारताला क्षेपणास्त्रे पुरवण्यासाठीचा ४६८ दशलक्ष डॉलरचा करारही दौऱ्यादरम्यान झाला. ब्रिटनमधील विद्यापीठे भारतात नऊ ठिकाणी शैक्षणिक संकुले उभारणार आहेत अशी भारतीय शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची घोषणा देखील करण्यात आली आहे. उभय देशांदरम्यान जुलै महिन्यात झालेल्या मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने संयुक्त समिती स्थापन करण्याचेही दोन्ही देशांनी ठरवले आहे. बॉलिवुड आणि ब्रिटनचे एक जिव्हाळ्याचे नाते आहे. या नात्यालाही पुन्हा उभारी देण्याचा प्रयत्न होणार असून बॉलिवुडमधील आघाडीचे निर्माते पुन्हा ब्रिटनमध्ये चित्रपट निर्मिती करणार आहेत अशी घोषणाही या दौऱ्यादरम्यान करण्यात आली. ब्रिटनची आर्थिक स्थिती गेला काही काळ फारशी चांगली राहिलेली नाही. ब्रेक्झिटनंतर म्हणजे युरोपियन बाजारपेठेपासून वेगळे झाल्यानंतर स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी झगडणाऱ्या ब्रिटनसमोर अनेक आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर उभय देशांमधील सहकार्याचा दोन्ही देशांना लाभ होणार आहे.**

# गतिमान प्रशासनाचे नवे प्रतिमान : ई–ऑफिस

कधी काळी सरकारी कार्यालयात पाऊल टाकलं की सर्वप्रथम नजरेत भरायचे ते म्हणजे टेबलांवर रचलेले फाईलींचे डोंगर. धूळ, उघडी पानं, आणि त्या सगळ्यांच्या गर्दीत हरवलेले अर्ज... हे दृश्य भारतीय प्रशासनाची ओळख बनले होते. फाईल अजून आली नाही, सही बाकी आहे, प्रकरण मंत्रालयात आहे... अशी उत्तरं नागरिकांनी वर्षानुवर्षे ऐकली. शासनाकडे केवळ हक्कासाठी नव्हे, तर आपली फाईल 'अडकू नये' म्हणूनच लोकांना फेऱ्या माराव्या लागत. या सगळ्याचं कारण साधं होतं, शासनाची प्रणाली पूर्णपणे कागदांवर चालायची. फाईल हातोहात फिरवली जायची. ती कुठे हरवली, कोणाकडे अडकली हे शोधणं म्हणजे गवताच्या गंजीत सुई शोधण्यासारखं काम होतं. परंतु, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चाणाक्ष नजरेने ही बाब हेरली आणि १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या कामात प्रत्येक विभाग आणि कार्यालयाला ई–ऑफिस प्रणालीवर येणे अनिवार्य केले. बघता बघता नंदुरबार सारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात एक नाही तर तब्बल ३४ कार्यालये आजतागायत ई–ऑफिस प्रणालीवर आली आहेत.



### ई–ऑफिसचा जन्म

२०००च्या दशकात सरकारने ठरवलं की बदल आवश्यक आहे. देश माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करत होता. तेव्हा 'ई–गव्हर्नन्स' ही संकल्पना पुढे आली. शासनाच्या प्रत्येक कामकाजात डिजिटल तंत्रज्ञान आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. राष्ट्रीय माहिती केंद्राने या संकल्पनेला प्रत्यक्ष रूप दिलं आणि ई–ऑफिस प्रणाली विकसित केली. कल्पना साधी, पण क्रांतिकारक होती–कागदाऐवजी संगणक, हस्ताक्षराऐवजी डिजिटल सही, आणि फाईलऐवजी ऑनलाईन व्यवस्थापन. या प्रणालीत प्रत्येक अर्ज, पत्र किंवा प्रस्ताव डिजिटल स्वरूपात तयार होतो. त्यावर अधिकाऱ्यांची टिपणी, आदेश आणि निर्णय थेट ऑनलाइन नोंदवले जातात. फाईल कुठे आहे? हा प्रश्न कायमचा संपतो.

### बदलाची पहिली पावले

सुरुवातीला सर्व काही सोपं नव्हतं. अनेक कर्मचाऱ्यांना संगणकाची सवय नव्हती. की–बोर्डवर टायपिंग करणे अवघड वाटत होते. कागदावर काम करण्याची मानसिकता खोलवर रुजलेली होती, पण जसजसा अनुभव वाढला, तसतसे वातावरण बदलू लागले. पहिल्या काही फाईली वेळेत पूर्ण झाल्या, काही अर्ज अपेक्षेपेक्षा जलद मंजूर झाले. लोकांना जाणवलं की ई–ऑफिस ही केवळ तांत्रिक प्रणाली नाही, तर कामकाजाच्या संस्कृतीतला बदल आहे. कागदावरील अवलंबित्व कमी झालं, खर्च घटला आणि निर्णय प्रक्रियेला वेग आला. अधिकाऱ्यांना कामावर अधिक नियंत्रण मिळालं आणि नागरिकांना वेळेवर प्रतिसाद मिळू लागला.

### नंदुरबारचा डिजिटल प्रवास

महाराष्ट्रातील नंदुरबार हा आदिवासीबहुल, डोंगराळ आणि दुर्गम जिल्हा. इथल्या नागरिकांसाठी प्रशासनाची दारे नेहमीच थोडी दूर वाटायची. अर्ज दिल्यानंतर तो पुढे गेला का, कुणाकडे गेला, मंजुरी कधी मिळेल हे समजणं अवघड असायचं, पण काही वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात ई–ऑफिसची अंमलबजावणी झाली. प्रशिक्षण देण्यात आलं, नेटवर्क सुधारण्यात आलं, आणि प्रत्येक विभागाला या प्रणालीशी जोडण्यात आलं. आज जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला अर्ज थेट संगणकावर नोंदवला जातो. त्याची स्कॅन प्रत प्रणालीवर अपलोड होते, संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवली जाते आणि त्याची स्थिती रिअल–टाईममध्ये दिसते. नागरिकाला अर्जाचा क्रमांक मिळतो, ज्याद्वारे तो ऑनलाईन त्याचा मागोवा घेऊ शकतो.

### पारदर्शकता आणि जबाबदारी

ई–ऑफिसचं सर्वात मोठं यश म्हणजे पारदर्शकता. फाईल कुठे आहे, कोणाकडे आहे, किती दिवसांपासून आहे, हे सर्व प्रणालीवर स्पष्ट दिसतं. त्यामुळे जबाबदारी ठरते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो. पूर्वी फाईल हरवली की दोष ठरवणं कठीण होतं. आता प्रणाली स्वतःच नोंदी ठेवते. यामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. जिल्हा प्रशासनाने 'कागदविरहित कार्यालय' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. कागदांचा वापर घटला आहे, छपाईचा खर्च कमी झाला आहे आणि पर्यावरणालाही फायदा झाला आहे.

### नागरिकांच्या जीवनातील बदल

ई–ऑफिसचा परिणाम केवळ कार्यालयांपुरता मर्यादित राहिला नाही, तो थेट नागरिकांच्या जीवनात दिसतो. पेन्शनधारक वृद्धांना त्यांचा अर्ज वेळेत मंजूर होतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळते. शेतकऱ्यांना पिकविम्याचे पैसे योग्य वेळी मिळतात. फाईल हरवली हे वाक्य आता इतिहास झाले आहे. लोक हसून म्हणतात, फाईल पुढे गेली आहे. हा बदल शांत आहे, पण प्रभावी आहे.

### आव्हाने आणि शिकलेले धडे

ई–ऑफिसचा प्रवास सहज नव्हता. काही कर्मचाऱ्यांना नव्या प्रणालीबद्दल भीती वाटली. तांत्रिक त्रुटी आल्या, इंटरनेट मंद होतं, काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित होत असे. पण, प्रशासनाने सातत्य आणि संयम ठेवला. कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षण दिलं, अडचणी समजून घेतल्या आणि त्यावर एकत्रित उपाय शोधले. काही वर्षांतच सर्व कार्यालयांनी या प्रणालीला स्वीकारलं. या अनुभवाने दाखवून दिलं की इच्छाशक्ती असेल, तर कोणताही बदल शक्य आहे. आणि जेव्हा त्या बदलाच्या मागे नागरिकांचा विश्वास असतो, तेव्हा तो टिकून राहतो.

### नव्या युगाची सुरुवात

ई–ऑफिस ही फक्त प्रणाली नाही, ती शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा आहे. ती वेळ वाचवते, खर्च कमी करते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विश्वास निर्माण करते. नंदुरबार जिल्ह्याने हा प्रयोग यशस्वीपणे राबवला आहे. आज प्रत्येक विभागात कामकाज गतीमान झालं आहे. अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होते. नागरिकांनाही आपल्या प्रकरणाची स्थिती जाणून घेणं सोपं झालं आहे. प्रशासन आता केवळ फाईलींचं नाही, तर लोकांच्या अपेक्षांचं प्रशासन बनलं आहे.

### ई–ऑफिसचा पुढचा अध्याय

ई–ऑफिसचा प्रवास फक्त नंदुरबारपुरता नाही. तो त्या महाराष्ट्राचा आरसा आहे जो हळूहळू कागदांवरून स्क्रीनवर जात आहे. राज्य सरकारने पेपरलेस सचिवालय हे ध्येय ठेवलं आहे, आणि जिल्ह्यांची कामगिरी त्या दिशेने आशादायक आहे. पुढील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषण यांचा वापर ई–ऑफिसमध्ये वाढेल. फाईल फक्त डिजिटल न राहता स्मार्ट बनेल ती स्वतः पुढचा टप्पा ओळखेल, निर्णयप्रक्रियेत मदत करेल, आणि विलंब झाल्यास स्वयंचलित सूचना देईल. नंदुरबारसारख्या जिल्ह्यांनी या बदलाचं नेतृत्व केलं तर ग्रामीण भारताचं प्रशासनही डिजिटल युगात उभं राहील.

### नवी कार्यसंस्कृती

ई–ऑफिस ही केवळ सॉफ्टवेअर प्रणाली नाही, तर एक नवी कार्यसंस्कृती आहे जबाबदारी, पारदर्शकता आणि वेळेच्या मूल्याची संस्कृती. या प्रणालीने प्रशासनातील मानवी संवेदनांना नवी उंची दिली आहे. जेव्हा एखाद्या वृद्धाला पेन्शन वेळेत मिळते, तेव्हा ती फक्त फाईल पूर्ण झाल्याची नोंद नसते, तर त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान प्रशासनाच्या मानवतेचं प्रतीक असतं.

ई–ऑफिस प्रणालीचा प्रवास म्हणजे कागदांच्या ढिगाऱ्यांमधून डिजिटल प्रकाशाकडे नेणारी वाट. तो प्रवास फक्त तांत्रिक बदलांचा नाही, तर लोकशाहीला नवा श्वास देणारा आहे. नंदुरबारचा अनुभव सांगतो की तंत्रज्ञान हे कुणाची मक्तेदारी नाही; ते डोंगर, पाडे आणि शेतीमध्येही तितक्याच ताकदीने रुजू शकतं.

आज फाईल हरवली हे वाक्य इतिहास आहे आणि फाईल एका क्लिकवर ही वास्तवाची नवी ओळख. कदाचित काही वर्षांनी आपण मागे वळून पाहू तेव्हा लक्षात येईल की, ई–ऑफिस ही केवळ संगणक प्रणाली नव्हती तर ती भारताच्या लोकशाहीच्या नव्या अध्यायाचं पहिलं पान होती.

**–रणजितसिंह राजपूत,**
माहिती व जनसंपर्क संचालनालय



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल नंबर नसेल तरीही चॅटिंग करता येणार!

स्मार्टफोन वापरणारे जवळपास सर्वच लोक व्हॉट्सअॅपचा वापर करतात. मेटा कंपनी ग्राहकांसाठी सतत नवनवीन फीचर्स आणत असते. आता आगामी काळात व्हॉट्सअॅपमध्ये एक महत्त्वाचे फीचर जोडले जाणार आहे. यात इंस्टाग्रामप्रमाणे युजर्सनेम तयार करता येणार आहे. त्यामुळे तुमच्याकडे एखाद्याचा नंबर नसला तरी त्याच्यासोबत चॅटिंग करता येणार आहे. कंपनी या फीचरवर गेल्या काही काळापासून काम करत आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात...



WABetaInfoने अलिकडेच एक अहवाल सादर केला आहे. यानुसार युजरनेम फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२५.२८.१२ अपडेटमध्ये दिसले आहे. याचा एक स्क्रीनशॉट समोर आला आहे. यात युजर्सना त्यांच्या व्हॉट्सअॅप प्रोफाइल सेटिंग्जमध्ये युजर्सनेम फीचर पाहता येणार आहे. इन्स्टाग्राम, फेसबुकसह इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर युजर्सनेम तयार करता येते, त्याचप्रमाणे आता व्हॉट्सअॅपवर युजर्सनेम तयार करता येणार आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार युजरनेम तयार करताना काही अटींचे पालन करावे लागणार आहे. युजर्सनेम "www'ने बनवता येणार नाही. कारण यामुळे एखाद्या अधिकृत वेबसाइटबद्दल गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच युजर्सनेममध्ये किमान एक अक्षर असणे आवश्यक आहे. त्यातबरोबर संख्या आणि अंडरस्कोअर्सचाही वापर करता येणार आहे. WABetaInfo ने दिलेल्या माहितीनुसार या फीचरवर काम सुरु आहे. सध्या त्याची बीटा टेस्टिंग सुरु आहे, मात्र ते Google Play बीटा प्रोग्राममध्ये रजिस्टर केलेल्या सर्व युजर्ससाठी उपलब्ध नाही. रिपोर्टनुसार हे फीचर आगामी काळात इतर बीटा युजर्ससाठी उपलब्ध करून दिले जाण्याची शक्यता आहे.

त्याचबरोबर व्हॉट्सअॅपमध्ये Meta लवकरच एक नवीन सुरक्षा फीचर जोडणार असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे युजर्सना नको ते मेजेस रोखता येणार आहेत. यासाठी युजर्स आपल्या प्रोफाइलसाठी युजरनेम आणि पिन सेट करू शकणार आहेत. युजर्सना युजरनेम तयार करण्याचा आणि ते रिझर्व करण्याचाही पर्याय मिळणार आहे. त्यामुळे आगामी काळात व्हॉट्सअॅपमध्ये मोठे बदल पहायला मिळणार आहेत.

# संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर

भारतातील परम या सुपर कॉम्प्युटरच्या बांधकामाची देखरेख करण्यासाठी ते प्रसिद्ध असलेले व भारतीय संगणक शास्त्रज्ञ, माहिती तंत्रज्ञानातील नेते आणि शिक्षणाचे वकील विजय पांडुरंग भाटकर यांचा आज जन्मदिन आहे. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण आणि पद्मश्री आणि महाराष्ट्र सरकारने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केलेला आहे.



## निमित्त

डॉ. विजय भटकर यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९४६ रोजी महाराष्ट्रात अकोला जिल्ह्यातील मुरांबा येथे झाला. मूर्तिजापूर येथील संत गाडगे महाराजांनी स्थापन केलेल्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले. शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या डॉ. भाटकरांनी वयाच्या १८व्या वर्षी अभियांत्रिकी पदवी मिळवली. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठातून एमटेक केल्यानंतर ते दिल्लीच्या आयआयटीमध्ये दाखल झाले. वयाच्या अवघ्या २६व्या वर्षी त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्यांनी आयआयटी दिल्ली, नागपूर येथील सर विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि एमएस वडोदरा येथील विद्यापीठात अनुक्रमे १९६५मध्ये अभियांत्रिकी पदवी आणि १९६८मध्ये अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी घेतली. पुण्यातील सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कॉम्प्युटिंगमध्ये डॉ. भाटकर यांनी १९८७मध्ये सुपर कॉम्प्युटर तयार करण्याच्या प्रकल्पावर देखरेख केली. यामुळे भारतातील पहिले सुपर कॉम्प्युटर, परम ८००० आणि परम १०००० तयार झाले.

डॉ. भटकर यांनी त्यांच्या इतर कर्तृत्वाव्यतिरिक्त ८०हून अधिक संशोधने लिहिली, संपादित केली आणि तयार केली. कॉम्प्युटर सायन्सच्या क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्लीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे ते अध्यक्ष आहेत. या व्यतिरिक्त ते विज्ञान भारतीचे नेते आहेत. आयआयटी दिल्लीने त्यांना १९७२मध्ये अभियांत्रिकीमध्ये पीएचडी प्रदान केली. आयटी शिक्षण आणि संशोधन अधिक करण्यासाठी डॉ. भटकर यांनी आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली. या संस्थेत अध्यापनासह उच्च शिक्षण संशोधन सुविधांचे नियोजन करण्यात आले.

डॉ. भटकर यांनी लिहिलेल्या आणि संपादित केलेल्या बारा पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे आणि त्यांनी ऐंशीहून अधिक संशोधनात्मक लेखही दिले आहेत. २०३०पर्यंत भटकरांच्या मते, भारत चीन आणि अमेरिका या दोघांनाही मागे टाकून जगातील आघाडीचे राष्ट्र बनणार आहे. राष्ट्राला सशक्त, दूरदर्शी प्रतिनिधित्व आणि त्यासाठी योग्य दिशा हवी आहे. रॉयल सोसायटीने २००३मध्ये शास्त्रज्ञांचा एक गट दक्षिण आफ्रिकेत पाठवला आणि विजय भटकर यांनी त्यांचे नेतृत्व केले.

संत गाडगे महाराजांचा आदर्श समोर ठेवून विज्ञान व अध्यात्माची सांगड घालत ते कार्यरत आहेत. संपूर्ण देशातील तीर्थक्षेत्रे 'ज्ञानतीर्थक्षेत्रे' व्हावीत यासाठी आळंदीपासून त्या स्वरूपाचे काम त्यांनी सुरू केले आहे. युरोपियन संस्कृतीचा अभ्यास करणारे तसेच आध्यात्मिक अनुभूतीसाठी ध्यानधारणा करणारे व आजही सक्षमतेने कार्यरत असलेले डॉ. विजय डॉ. भटकर भारतीय युवकांचे आदर्श ठरलेले आहेत. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# ऑक्टोबर हीटमध्ये अशी घ्या स्वतःची काळजी

पावसाळा जसजसा संपू लागतो, तसे आपण सगळेच हिवाळा सुरू होण्याची वाट पाहू लागतो, पण सध्या आपण सगळेच 'ऑक्टोबर हीट'चा सामना करीत आहोत, ज्याला पावसाळ्यानंतरचे हवामान म्हणतात. विशेषतः उष्ण कटिबंधीय आणि उपोष्ण कटिबंधीय प्रदेशांमध्ये हे हवामान आढळून येते.



याबद्दल उजाला सायग्नस हॉस्पिटल्सचे वैद्यकीय संचालक डॉ. आविद अमीन सांगतात की, उन्हाळ्यातील उष्णता कोरड्या वातावरणात असते, तर ऑक्टोबर हीटमध्ये पावसाळ्यातून उरलेल्या आर्द्रतेसह उच्च तापमान असते. ऑक्टोबरमध्ये कमी किंवा अगदी न पडलेल्या पावसामुळे वातावरणात आर्द्रता टिकून राहते, ज्यामुळे तापमानातील उष्णता अनुभवायला मिळते, पण ही उष्णता उन्हाळ्यातील तापमानासारखी कोरडी नसते. त्यामुळे विशेषतः उत्तर भारत, महाराष्ट्र, गुजरात यांसारख्या प्रदेशांमध्ये अस्वस्थ करणारे वातावरण निर्माण होते, जे कोरड्या उन्हाळ्याच्या उष्णतेपेक्षा वेगळे ठरते. या कालावधीत वारा नसल्यामुळे अस्वस्थता वाढू शकते, कारण उष्णता, आर्द्रता वातावरणात अडकून राहते. याशिवाय शहरी भागात उष्णतेच्या बेटाच्या घटनेमुळे एक मिश्रित प्रभाव अनुभवला जातो. या ठिकाणी काँक्रीट, डांबरी पृष्ठभाग उष्णता शोषून घेतात आणि ती टिकवून ठेवतात आणि त्यामुळे शहरे या काळात आणखी गरम होतात.

ऑक्टोबर हीटमध्ये सुरक्षित राहण्यासाठी आणि शरीराला हायड्रेशन मिळवून देण्यासाठी दिवसभर भरपूर पाणी प्या. शरीर थंड राहण्यासाठी सौम्य रंगाचे अन् सैलसर कपडे घाला. सकाळी १० ते दुपारी ४दरम्यान खूप ऊन असेल त्या वेळी बाहेर जाणे टाळण्याचा प्रयत्न करा. पंखे, वातानुकूलन यंत्र यांद्वारे तुमच्या घरातील वातावरण थंड ठेवा. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी वारंवार थंड शॉवर, स्पंज बाथ घ्या फळे, भाज्या भरपूर असलेल्या हलक्या जेवणाचे सेवन करा. त्यामुळे शरीरातील उष्णता न वाढता, तुमची ऊर्जा टिकून राहते आदी उपाय सुचवले आहेत. त्याचबरोबर कॅफिन, अल्कोहोल टाळण्याचा प्रयत्न करा, कारण यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. त्याचप्रमाणे या वातावरणात वृद्ध, लहान मुले आदी व्यक्तींची तपासणी करणेदेखील महत्त्वाचे आहे. ते उष्णतेच्या बाबतीत अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे तुमच्या अन् त्यांच्या शरीराकडे लक्ष द्या. तुम्हाला चक्कर येणे, थकवा येणे किंवा डोकेदुखी जाणवू लागल्यास, उष्णतेशी संबंधित हे आजार टाळण्यासाठी वैद्यकीय मदत घ्या, असे डॉ. अमीन सांगतात.

# अलिबागच्या खंडाळे गावात जमीन घोटाळा

## गटविकास अधिकाऱ्यांनी दिले कारवाईचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील खंडाळे ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या संगमपाडा येथील सरकारी रस्ता बंद करून, त्याची परस्पर विक्री केल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. या प्रकरणी ग्रामपंचायत स्तरावर झालेल्या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत. महत्वाचे म्हणजे असेसमेंट उतारा असलेली अनेक घरे अस्तित्वातच नाहीत. चौकशी अहवालाच्या आधारावर अलिबागच्या गटविकास अधिकारयांनी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

यात जिल्हा परिषद ग्रामविकास विभाग, भूमी अभिलेख विभागातील बडे अधिकारी गुंतले असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. अलिबाग शहरापासून काही अंतरावर असलेल्या या परिसरात ताज ग्रुपचा ताराकींत हॉटेल, जिल्हा क्रीडा संकुल असल्याने येथील गुंठ्याला १५ ते २० लाख रुपयांचा भाव आहे. यामुळे येथील गावठाण जागेतील जमीन हडप करून ती करोडो रुपयांमध्ये विकण्याचे षडयंत्र रचले जात असून याकडे सरकारी यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

संगमपाडा येथील महेश मनोहर पेडणेकर व इतर ग्रामस्थांनी याबाबत पंचायत समिती अलिबागकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. खंडाळे गावातील प्रॉपर्टी कार्ड क्रमांक १२४ मधील शासकीय जागेत असलेला ग्रामपंचायत रस्ता बंद करून, ग्रामपंचायत व ग्रामसेवकांच्या माध्यमातून ही जागा परस्पर विकण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला होता. या तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समितीच्या आदेशानुसार, ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे येथील अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी तक्रारदार, उपसरपंच आणि सदस्यांच्या उपस्थितीत जागेवर जाऊन चौकशी केली. या चौकशीचा अहवाल पंचायत समितीकडे सादर केला.

ग्रामपंचायतीच्या अहवालानुसार, संगमपाडा येथील या प्रकरणात प्रॉपर्टीकार्ड क्रमांक १२४ मधील काही कुटुंबीयांनी महाराष्ट्र शासनाच्या जागेवर सिटी सर्वेचा नकाशा पाडून व्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे. या चौकशीत सर्वात गंभीर बाब म्हणजे, ग्रामपंचायत असेसमेंट नोंदीमध्ये असलेली अनेक घरे जागेवर अस्तित्वातच नसल्याचे उघड झाले आहे.

या घरांची ग्रामपंचायत दप्तरी नोंद आहे, परंतु ती घरेही जागेवर निदर्शनास आली नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी तातडीने कार्यवाही करून, केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल पंचायत समिती कार्यालयास सादर करावा, असे निर्देश गटविकास अधिकारी डी.एच. दाईंगडे यांनी दिले आहेत.

अधिकाऱ्यानी दिलेल्या या आदेशामुळे आता संगमपाडा येथील या भूखंड गैरव्यवहार प्रकरणी कारवाईला गती मिळण्याची शक्यता आहे.

### काय आहेत तक्रारदारांचे आरोप?

**खोट्या घरपट्ट्या आणि प्लॉटची निर्मिती: तत्कालीन ग्रामसेवक यांनी ठराविक व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या नावे खोट्या घरपट्ट्या बसवून, त्यांना घरे नसतानाही जागेत ५ प्लॉटचे नकाशे बनवले. सिटी सर्व्हे अधिकारी आणि पंचनामा करण्यासाठी आलेले अधिकारी यांच्याशी हातमिळवणी करून हे ५ प्लॉट आकारण्यात आले, असा आरोप करण्यात आला आहे. ही जागा जिल्हाधिकारी व तहसिल अलिबाग यांच्या पाहणीखाली असताना, ग्रामसेवकांनी 'शासनाचे लक्ष नाही' याचा फायदा घेऊन जागेची विल्हेवाट लावली, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
**महाराष्ट्र सागरी मंडळ**
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०
Website : https://mahammb.maharashtra.gov.in Email: ceo.mmbmaharashtra.gov.in/ceommb@gmail.com

**ई निविदा सूचना (सन २०२५-२६)१२३/१२४/१२५/१२६/१२७/१२८**
Main Portal : https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामांसाठी बी-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | दाभोळ मोहल्ला येथे पोचरस्ता तयार करणे, ता. महाड जि. रायगड, | ४५,२२,७८५/- | ४५,५००/- | ५९०/- | ९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| २ | सोनखार न्हावे ता. रोहा जि. रायगड येथे हाडी बंदराकडे जाणारा रस्ता तयार करणे. | ४१,२८,८८४/- | ४१,५००/- | ५९०/- | ९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ३ | दाभोळ खडपवाडी येथे पोचरस्ता तयार करणे, ता. महाड जि. रायगड, | ४०,९२,५२०/- | ४१,०००/- | ५९०/- | ९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ४ | नवखार ता. रोहा जि. रायगड येथे गारगे बंदराकडे जाणारा रस्ता तयार करणे, | ४०,७०,५८१/- | ४१,०००/- | ५९०/- | ९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ५ | महालुंगे महादेवखार ता. रोहा जि. रायगड येथे पोशीरे बंदराकडे जाणारा रस्ता तयार करणे. | ३९,४७,१५६/- | ३९,५००/- | ५९०/- | ९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ६ | राजपुरी येथील जुन्या जेट्टी जवळ तिकीट काऊंटर व उपहारगृह बांधणे, ता. मुरूड जि. रायगड. | २८,२६,९०८/- | २८,५००/- | ५९०/- | ९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक १४.१०.२०२५ रोजी ११:०० ते दिनांक १४.१०.२०२५ रोजी १७:०० पर्यंत** उपलब्ध होतील.
कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

दिनांक : १०/०१०/२०२५ क्रमांक : आरओसी-२०२५-२६-क्र-५/सी ३११३

**सही/-**
**(तुषार पाटोळे)**
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

राहूल शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित
**सत्याग्रह अध्यापक महाविद्यालय**
(मुंबई विद्यापीठ संलग्न)
सुप्पारक भवन, प्लॉट नं. 52, सेक्टर 19, खारघर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड
**प्रवेश सूचना : 2025 - 2026**

बी.एड प्रथम वर्ष संस्था / कॉलेज स्तरावरील रिक्त जागेवर प्रवेश इच्छुक पात्र उमेदवाराकडून नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | कॉलेज कोड | माध्यम | एकूण जागा | कॉलेज/इन्स्टिट्यूशन स्तरावरील रिक्त जागेची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 24052 | मराठी | 100 | 35 |

1) पात्रता (NCTE) एन सी टी इ आणि संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य (CET) सीईटी कक्ष मुंबई यांनी निर्धारित केलेली शैक्षणिक पात्रता, शर्थी आणि अटी (https://bedcap25.mahacet.org) पाहावे.
2) महाविद्यालय कार्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत नमुन्यातील अर्ज अवगत करून १४ ऑक्टोबर २०२५ पूर्वी कार्यालयात जमा करावे.
3) इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू भाषेत अध्यापनाची आणि लिहण्याची सोय मुंबई विद्यापीठाच्या धोरणानुसार मंजूर आहे.
4) भारत आणि महाराष्ट्र सरकार द्वारे निर्धारित केलेल्या नियमानुसार सर्व संवर्गातील पात्र विद्यार्थांना शिष्यवृत्ती आणि फ्रीशिपची सोय उपलब्ध आहे.

प्राचार्य

# खोपोलीतील शासकीय डेअरी भकास अवस्थेत



**खोपोली : प्रतिनिधी**

शेतीला पूरक जोडधंदा असलेल्या दुग्ध व्यवसायाला उतरती कळा लागली असून, शासकीय दुग्धालय बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णयामुळे खालापूर तालुक्यातील शिळफाटा येथे असलेले सर्वाधिक दूध वितरण करणारी डेअरी भकास अवस्थेत उभी आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीतून खेडोपाडी शेतीवर अवलंबून असलेल्या बळीराजाचे जीवनमान उंचावण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. शेतीला जोडधंदा दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी शासकीय दुग्धालय स्थापन करण्यात आले. रायगड जिल्ह्यात खालापूर आणि महाड येथे १९६० च्या सुमारास डेअरी सुरू झाली. सुरवातीला खालापूरात विठ्ठल मंदिर नजीक नंतर स्थलांतर होवून खोपोली शिळफाटा येथे डेअरी हलवण्यात आली. शिळफाटा येथे सुमारे साडेसात एकर जागेत सुसज्ज डेअरीतून दिवसाला दहा हजार लिटर पिशवी बंद दूध रायगड, मावळसह मुंबईत वितरण होत असे. जिल्ह्यातील कर्जत, पाली, नागोठणेसह विविध भागातील दूध संकलन करून खोपोली येथे आणले जात असे. शिवाय घाटमाथ्यावरून टँकर मधून आणलेल्या दूध प्रक्रिया करून पिशवी बंद केले जात असे.

नव्वदच्या दशकात खाजगी संस्थाचा शिरकाव शासकीय दुग्धालयासाठी मारक ठरले. खाजगी संस्था पुढे टिकाव न धरू शकल्याने आणि शासनाची उदासीनता यामुळे महाड , पाठोपाठ खोपोली येथील डेअरी देखील बंद झाली. खालापूर तालुक्यातील विकासाचे आणि छोट्या व्यावसायिकांचे, शेतकरी यांच्या कमाई केंद्र असलेली डेअरी बंद झाल्याने मोठा फटका बसला आहे.

मुंबई-पुणे महामार्गालगत मोक्याच्या ठिकाणी साडेसात एकर जागा डेअरीची आहे. २०२२ साली डेअरी पूर्ण पणे बंद करण्यात आली. यंत्र सामुग्री भंगारात काढण्यात आली. सध्या डेअरी भोवताली गवत, रान वाढले असून याठिकाणी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृह साठी जागेचा प्रस्ताव असल्याची माहिती मिळाली आहे.

**PUBLIC NOTICE**

This notice is issued to the general public and all concerned parties by **Mr. Gajendra Kumar Sinha**, the lawful owner and Licensor.

The registered Leave and License Agreement concerning Flat No. 1, Shiv Ganga Society Ltd., Plot No. 10, Sector 1, Vijay Marg, New Panvel (East), Navi Mumbai, legally expired on 31/08/2025.

The Licensee, Dr. Jyoti Sharma, has been served with legal notices and is required to immediately vacate the premises.

Alleged Supplementary Agreement is Null and Void

Dr. Jyoti Sharma is claiming rights under a purported "supplementary agreement" dated 01/12/2023.

I, Mr. Gajendra Kumar Sinha, hereby publicly declare this document to be a sham, fraudulent, unregistered, and unnotarized. It holds no legal standing, is not applicable, and has been declared legally null and void.

The public is warned that any transactions or claims related to this property based on the expired agreement or the alleged supplementary agreement will be illegal and conducted at their own risk.

DATE: 11/10/2025
PLACE: PANVEL

**sd/-**
**GAJENDRA KUMAR SINHA**
**(PHONE NO. 9969222641)**

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजेश सुरजमल शहा, रा. नानासाहेब देशमुख को. ऑप. हौ. सो. लि. १० वा मजला, फ्लॅट नं. १००१, देशमुख लेन, मुंबई ४००००४. यांनी दि. १५/०२/२०१८ रोजी 'रामप्रहर' या वृत्तपत्रामध्ये खालील वर्णन मिळकतीसंदर्भात सार्वजनिक सुचना दिलेली होती. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. (चौ.मी) |
|---|---|---|
| ३७३ | ९ | ११-२५-७ |

सदर मिळकती संदर्भात मे. न्यायालयात प्रलंबित असलेले सर्व प्रकारचे वाद संपुष्टात आलेले आहेत.

आमचे अशिल श्री. राजेश सुरजमल शहा यांनी दि. १५/०२/२०१८ रोजी ' रामप्रहर' या वृत्तपत्रामध्ये दिलेली सार्वजनिक सुचना ते या जाहिर नाटीशीद्वारे मागे घेत आहेत.

**सही/-**

**पनवेल**
**दि. ११/१०/२०२५**

अॅड. प्राजक्ता निलेश पाटील
शॉप नं. १२, पहिला मजला,
ए विंग, यशोकिरण को.ऑ.हौ.सो.लि.,
सावरकर चौक जवळ, लोखंडीपाडा,
पनवेल ४१०२०६, जि. रायगड.
मो.नं. ९९६७९१२५४१

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग,**
**अलिबाग पिन कोड – ४०२ २०१**
ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई- निविदा सूचना क्र. १५ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदार कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | अलिबाग रेवदंडा रस्ता प्र.रा.मा. ४ या रस्त्यावरील कि.मी. ०/६०० मधील बेली पुलाची पुर्नबांधणी करणे ता. अलिबाग, जि. रायगड | ६,०१,६२,४९४/ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** :- दिनांक १३.१०.२०२५ (स.१०.००) ते दिनांक २०.१०.२०२५ (सं.१८.००)
**निविदापुर्व बैठक :** :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. १४.१०.२०२५ रोजी दु. १२.०० वाजता
**ई-निविदा उघडणे** :- दिनांक २४.१०.२०२५ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ४४७७/२०२५**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१**
**दिनांक :- ०८/१०/२०२५**

**सही/-**
**(एम एम धायतकड)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि.रायगड

# माणगावचा निसर्ग पर्यटकांना खुणावतोय!



**माणगाव : बातमीदार**

पावसाचे अंतिम पर्व संपत असताना, ऑक्टोबरची उकाड्याची झळ आणि लगेचच सुरू होणारी थंडी यांचा संगम – अशा टप्प्यावर माणगांव तालुक्यात निसर्गाचे मोहक आणि जादुई रूप खुलून आले आहे. दिवाळीची चाहूल लागलेली असतानाच सकाळच्या वेळेस जाणवणारे आल्हाददायक धुके, डोंगरमाथ्यावर पांढऱ्या शुभ्र ढगांची चादर आणि चहूकडे पसरलेले हिरवे-पिवळे गवत, रंगीबेरंगी रानफुलांनी बहरलेली पठारे या दृश्यातून साक्षात स्वर्गीय आनंदाचा अनुभव मिळतो.

म्हणूनच असं म्हणावंसं वाटतं की, पश्चिम घाट आणि कोकणातील रायगड जिल्ह्याच्या दऱ्या-खोऱ्यांत निसर्गाने आपल्या दोन्ही हातांनी सौंदर्याची उधळण केली आहे. या मोहक दृश्यांना आपल्या मोबाईल कॅमेर्यात टिपण्याचा मोह अनेकांना आवरत नाही. मात्र, हे निसर्गसौंदर्य टिकवून ठेवणे ही आजची खरी गरज आहे.

फार्महाऊसच्या नावाखाली होणारी अतिक्रमणे, विकासाच्या नावाने चालणारी वृक्षतोड, दगड व मातीचे उत्खनन या सर्व गोष्टींमुळे हा निसर्ग मात्र नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

**महावितरण** | **ई-निविदा सूचना**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-४८, टी-४९, टी-५०, टी- ५१, टी-५२, टी-५३, आणि टी-५४ (२०२५-२६) अशा एकुण सात निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ११.१०.२०२५ पासून ते दि. १९.१०.२०२५** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २०.१०.२०२५** ला **दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत / तारखा / इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल. **(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**जाहिर सूचना**
**दिव्यांग कल्याण विभाग**

मा.अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने दिव्यांग कल्याण विभागातील सन २०२५-२०२६ करीता दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार व पुनर्वसन सेवा राबविण्याबाबत बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ५१७/५३४/२०२५**
**दिनांक :- १०/१०/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

**ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द**
**ता.तळा जि.रायगड**
**निविदा सुचना**

**ग्रामपंचायत येथे खालीलप्रमाणे कामासाठी जि.एस.टी.धारक नोंदणीकृत ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागण्याची ठरविले आहे.**

| अ क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा किंमत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख व वेळ | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पिण्याच्या पाण्याचा नवीन स्त्रोत करणे (चरई आदिवासी येथे सोलर यूनिट बसविणे) | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | २,९४,३००/- | २९४९/- | १००/- | दिनांक १५/१०/२०२५ वेळ सकाळी ११.०० वाजता | ३ महीने |
| २. | ओल्या सुक्या कचर्याचे विलीगीकरण करणे. (ग्रामपंचायत चरई खुर्द मध्ये ओला सुका कचरा विलेवट लावण्या करिता शेड बांधणे.) | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ३. | प्लास्टिक पिशव्या खरेदी संस्थेसाठी कापडी पिशवीचा वापर (कापडी पिशवी खरेदी करणे.) | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ४. | सौर दिवे बसविणे (ग्रामपंचायत हद्दीमध्ये गावातील सर्वजनिक ठिकाणी सौर दिवे बसविणे) | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | १,९४,३००/- | १९४३/- | १००/- | | |
| ५. | इमारतीची दुरुस्ती (चरई खुर्द मुळगाव कार्याशाले जवळ शेड बांधणे. | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ६. | सौर पथदिवे बसविणे(गौळवाडी शाळेला सौर पाठ दिवे बसविणे) | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ७. | कचरा विल्हेवाट युनिट(चरई खुर्द सर्व गावातील सार्वजनिक सिमेंट करणे) | १५ वा वित्त आयोग बंधित सन २०२५-२६ | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ८. | पेव्हर ब्लॉकचे बांधकाम(तळघर सभागृहा समोर पेव्हर ब्लॉक बसविणे. | १५ वा वित्त आयोग अबंधित सन २०२५-२६ | ६०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ९. | रस्त्यांची दुरुस्ती आणि देखभाल (गौळवाडी सभागृहा समोर पेव्हर ब्लॉक बसविणे) | १५ वा वित्त आयोग अबंधित सन २०२५-२६ | ६०,०००/- | ६००/- | १००/- | | |
| १०. | आरोग्यदायी आहाराचे महत्त्व प्रशिक्षण (महिलांना प्रशिक्षण देणे) | १५ वा वित्त आयोग अबंधित सन २०२५-२६ | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |
| ११. | अध्यापन सामग्रीचे वितरण( आशा सेविकांसाठी आरोग्य साहित्या खरेदी करणे) | १५ वा वित्त आयोग अबंधित सन २०२५-२६ | ३३,०००/- | ३३०/- | १००/- | | |
| १२. | घंटागाडी (बॅटरी ऑपरेट) | ग्रामनिधी | २,२०,०००/- | २२००/- | १००/- | | |
| १३. | सार्वजनिक भांडी देणे | ग्रामनिधी | १,००,०००/- | १०००/- | १००/- | | |
| १४. | प्राथमिक शाळेना सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. | ग्रामनिधी | ५०,०००/- | ५००/- | १००/- | | |

**अटी व शर्ती -**
१)सदर कामांचे अंदाजपत्रकीय व आराखडे कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल,
२)प्राप्त निविदा ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांच्या समक्ष सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
३) निविदा सोबत ठेकेदाराने नोंदणीची सत्यप्रत जोडावी व प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी. नोंदणीकृत ठेकेदारांना प्राधान्य देण्यात येईल.
४) सुरक्षा अनामत रक्कमेपैकी १% रक्कम कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी भरावी लागेल व उर्वरित रक्कम देयकातून कपात करण्यात येईल तसेच प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे कराची रकम कपात केली जाईल.
५) सदरील काम अंदाजपत्रकाप्रमाणे व पंचायत समिती तळाकडील कनिष्ट अभियंता पाणीपुरवठा / बांधकाम यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली करावे लागेल.
६)कोणतीही १ अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांना राहील.
७)सविस्तर अटी व शर्ती करिता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क करावा.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चरई खुर्द**
**ता. तळा, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चरई खुर्द**
**ता. तळा, जि. रायगड**

# एनएमएमटीच्या प्रवासाचाही मुंबई वन ॲपमध्ये समावेश

**नवी मुंबई : बातमीदार**



आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटन सोहळ्यामध्ये मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'मुंबई वन ॲप (वन ॲप – लिमिटलेस जर्नीज्)' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज पचे अनावरण झाले असून यातून शहर गतीशीलतेला नवा आयाम लाभला आहे.

मुंबई महानगर प्रदेशात असलेल्या ११ सार्वजनिक वाहतूक ऑपरेटर्सचा समावेश असणारा हा देशातील पहिला संयुक्त मॉबिलिटी प्लॅटफॉर्म आहे. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक प्रवासी वाहतुक परिवहन उपक्रमाचाही सहभाग असून आता एनएमएमटीचे तिकीट प्रवाशांना या संयुक्त ऑनलाइन ॲपद्वारे काढता येणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र राज्य हे भारत देशातील स्मार्ट, जलद आणि अधिक शाश्वत शहरांच्या परिवर्तनाचे नेतृत्व करीत आहे.त्याचाच एक भाग म्हणून स्थानिक ट्रेनपासून ते महानगरांपर्यंत, बसेसपासून ते मोनोरेलपर्यंत, प्रवासी आता फक्त 'मुंबई वन' या एकाच ॲपचा वापर करून नियोजन,आरक्षण आणि प्रवास करू शकतात. पंतप्रधान महोदयांच्या डिजिटल इंडियाच्या स्वप्नाची आणि एमएमआरडीएच्या MumbaiInMinutes या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी 'मुंबई वन ॲप' हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. याद्वारे वाहतुकीच्या अनेक सेवा एकत्रित करून प्रवासाचा वेळ कमी होणार आहे, सुलभता वाढणार आहे तसेच लाखो लोकांचे जीवनमान सर्वार्थाने सुलभ होणार आहे.या ॲपमध्ये एनएमएमटीच्या प्रवासी सेवेचाही समावेश असल्याने नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या ॲपचा प्रत्येकाने वापर करावा असे आवाहन केले आहे.

# पंतप्रधानांना भेटल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**कळंबोली : बातमीदार**



जागतिक स्तरावरील सर्वोच्च व्यक्तींपैकी एक अन देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्व सुरक्षा यंत्रणा नियम अटी पाडून भेटणे खूपच सर्वसामान्यांना दुरापास्त आहे, पण त्यांच्या दौऱ्यादरम्यान पंतप्रधानांना जवळून पाहता येणे, त्यांना भेटणे आणि त्यांना नमस्कार करणे आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी त्यांना केलेला हात जोडून नमस्कार त्यांनी तो नमस्कार स्वीकारणे ही संकल्पना भाजपच्या नेतृत्वाने अमलात आणल्याने महायुतीतील पनवेलमधील कार्यकर्ते बेहोद खुश झाले आहेत. देशाच्या पंतप्रधानांना अगदी जवळून पाहिल्याने भेटल्याने कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष निर्माण झाला आहे.

देशाचे कणखर पोलादी यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पनवेलमध्ये अद्यापपर्यंत सहा वेळा दौरा झाला. या दौऱ्यादरम्यान ज्या ठिकाणी हेलिपॅड, विमानतळ किंवा कार्यक्रमाचे स्थळ या ठिकाणावर पंतप्रधान जिथे येतात तेथून कार्यक्रमापर्यंत पायी चालत जाताना दुतर्फा त्यांच्या स्वागताच्या निमित्ताने स्वागत करण्याची संधी सर्वसामान्य कार्यकर्त्याला भाजपच्या पनवेल मधील वरिष्ठ नेत्यांनी व पनवेलचे कार्यसम्राट दमदार आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिल्याने महायुतीतील कार्यकर्ते बेहद खुश झाले आहेत .

नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटनसमयीसुद्धा कार्यक्रम स्थळापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी येताना त्यांचे स्वागत करण्याची संधी महायुतीतील भाजप, एकनाथ शिंदे शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांना त्यांना जवळून भेटून त्यांना नमस्कार करण्याची संधी देण्यात आली. यामध्ये स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना ही अलौकिक आणि अनमोल सुवर्णसंधी मिळाल्याने देशाच्या पंतप्रधानांना जवळून पाहण्याची व त्यांना नमस्कार करण्याची व त्यांनीसुद्धा नमस्कार केल्याने कार्यकर्त्यांमध्ये एक नवा उत्साह संचारला आहे.

त्याचबरोबर कार्यक्रम संपल्यानंतरही जेथपर्यंत विमान उभे होते तोपर्यंत जातानाही विविध प्रमुख नेत्यांना त्यांच्या मार्गावर त्यांना निरोप देण्यासाठी ही उभे करण्यात आले. त्यामुळे पंतप्रधानांचे आगमन आणि त्यांचे निरोप समारंभ यावेळी अनेकांना त्यांना जवळून पाहण्याची त्यांना भेटण्याची त्यांना नमस्कार करण्याची सुवर्णसंधी मिळाली.

भाजपच्या या विशेष उपक्रमाने भाजपची या निमित्ताने कार्यकर्त्यांची फौजही तितकीच कणखर मजबूत होऊन आगामी होणाऱ्या निवडणुकांमध्ये तितक्याच जल्लोषात हेच कार्यकर्ते पक्षाचे काम जोमाने आणि तडफेने निश्चितच करतील असा निश्चय ही कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

अद्यापपर्यंत पनवेलमध्ये देशाचे पंतप्रधान सहा वेळा येऊन गेले आहेत. मग त्यामध्ये अटल सेतूचे उद्घाटन समारंभ, नवी मुंबई विमानतळाचे पायाभरणी समारंभ, नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन, खारघरमधील प्रचाराच्या दोन सभा तसेच खारघर मधील इस्कॉनच्या कृष्ण मंदिराचे लोकार्पण सोहळा

यावेळी पंतप्रधान पनवेल नगरीमध्ये येऊन गेले आहेत. या प्रत्येक वेळी भाजपने पंतप्रधानांना भेटण्याची सुवर्णसंधी अनेक सर्वसामान्य कार्यकर्त्याला दिलेली आहे.

# रबाळे पोलिसांची नशामुक्त शाळा अभियानांतर्गत जागृती



**पनवेल: वार्ताहर**

'नशा मुक्त भारत' अभियाना अंतर्गत नवी मुंबई पोलिसांनी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. रबाळे पोलीस स्टेशनच्या वतीने 'नशा मुक्त शाळा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ घणसोली येथील न्यू बॉम्बे स्कूल मध्ये करण्यात आला असून, विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत नशामुक्त जीवनाची शपथ घेतली.

या उपक्रमाचे नेतृत्व पोलीस उपनिरीक्षक वर्षा कल्याण काळे यांनी केले असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी माहिती देण्यात आली. माहितीपट आणि पोस्टर्सच्या माध्यमातून व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम दाखवण्यात आले.या वेळी वर्षा काळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आजची तरुण पिढी ही देशाचे भविष्य आहे, पण व्यसनाधीनतेचा धोका या भविष्याला अंधारात ढकलतो. प्रत्येक शाळा नशामुक्त झाली तरच समाज सुदृढ बनेल. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याचे आणि अमली पदार्थांचा वापर करणाऱ्यांविषयी पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन वर्षा काळे यांनी केले.

शाळेच मुख्याध्यापक व शिक्षकवृदानी रबाळे पोलिसांच्या या उपक्रमाचे स्वागत केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारा ठरेल असे मत व्यक्त केले. गुन्हेगारी रोखण्यासोबतच सामाजिक जबाबदारी पार पाडणे आमचे कर्तव्य आहे. पुढील काळात नवी मुंबईतील इतर शाळांमध्येही असे उपक्रम राबवले जातील. असे सुतोवाच वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत केले. या 'नशा मुक्त शाळा' अभियानामुळे नवी मुंबईतील तरुण पिढी व्यसनांपासून दूर राहून सुदृढ समाजाच्या निर्मितीकडे वाटचाल करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# खारघर जलवायू फेज १समोरील नाल्याच्या साफसफाईची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील जलवायु फेज १ समोरील नाल्याची तातडीने साफसफाई व झाकणाबाबत भाजप खारघर मंडळाचे जिल्हा सचिव ब्रीजेश पटेल यांनी पनवेल महानगरपालिकेचे उपआयुक्त वैभव विधाते यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

सदर नाल्यात मोठ्या प्रमाणावर गाळ, कचरा व शेवाळ साचल्याने पाण्याचा निचरा थांबला असून, परिसरात दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढले आहे. या कारणामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

भाजप उत्तर रायगडचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यानी पनवेल महानगरपालिकेकडे तातडीने नाल्याची सफाई करून गाळ काढण्याची तसेच भविष्यातील अस्वच्छता टाळण्यासाठी नाला झाकण्याची मागणी



केली आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल व सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# मुख्य न्यायमूर्तींचा अवमान करणाऱ्या राकेश किशोर यांचा निषेध

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्यावर ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या अवमानाचा निषेध करण्यासाठी खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालय आणि डॉ. जी. के. डोंगरगावकर विधी महाविद्यालयात उपस्थितीत विद्यार्थ्यांची मंगळवारी महाविद्यालयाच्या सभागृहात बैठक झाली. या बैठकीला विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती बी. आर. गवई यांच्याविषयी राकेश किशोर या प्रतिगामीनी आनादराच्या भावनेतून न्यायमूर्तीच्या दिशेने जोडा फेकत अपमान केला, त्याचा निषेध एकमताने करण्यात आला.



यावेळी बैठकीत प्रा डॉ. जी.के. डोंगरगावकर, माजी जिल्हा न्यायाधीश आणि महाराष्ट्र न्यायाधीश असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. यशवंत चावरे, समान संधी सेलचे प्रमुख ॲड. राजरत्न डोंगरगावकर, डॉ. निधी अग्रवाल, डॉ. प्रीती शर्मा, प्राचार्य वनिता सूर्यवंशी विधी महाविद्यालय विद्यार्थी प्रतिनिधी हर्ष कांबळे तसेचविधी, शिक्षण, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सर्व प्रकरणाचा सखोल तपास एका स्वतंत्र यंत्रणेद्वारे करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसेच रजिस्ट्रार जनरल, सुप्रीम कोर्ट यांना केली असल्याचे प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी सांगितले.

# तुळजाभवानी माता संस्थेने पूरग्रस्तांना केले वस्तूंचे वाटप

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील तुळजाभवानी माता सामाजिक संस्थेने धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील वडनेर गावामध्ये पूरग्रस्त बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे २०० कीडचे वाटप करून संस्थेने सामाजिक बांधिलकी जपण्याची भावना व्यक्त केली आहे

धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील वडनेर गावामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे खुप मोठे नुकसान झाले आहे.या गावात अतिवृष्टीमुळे पुराच्या पाण्याचे प्रमाण खूप जास्त असल्यामुळे गावातील ५० ते ६० घरे पुर्णपणे पाण्याखाली गेली होती.प्रशासनाने वेळेवर मदत केली या महापुरामुळे या कुटुंबियांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.यामध्ये शेतीचे मोठे नुकसान झाले, घरातील सर्व भांडे, धान्य, वाहून गेली.

जय तुळजा भवानी माता सामाजिक संस्था, कळंबोली यांनी ठरविले की आपण सर्वांनी मिळून आपल्या संस्थेमार्फत या सर्व कुटुंबानां जीवणावश्यक वस्तूंची मदत करायची.त्यानुसार सर्व सभासदांची बैठक घेऊन २०० जिवनावश्यक वस्तूंचे किट तयार केले. या किटमध्ये तेल, तांदूळ, आटा, रवा, डाळ, साखर, साबण, ब्रश,बिस्कीट, कोलगेट, कपडे, कांदा, बटाटा, साडी, कपडे, चादर याचा समावेश होता. तयार करण्यात आलेले किट स्वतः जय तुळजाभवानी माता सामाजिक संस्थेचे सभासद आणि पदाधिकारी यांनी वडणेर गावातील गरजवंतांना वाटप केले.




# पुरंदर स्नेह ग्रंथ संग्रहालयातर्फे मराठी भाषा सप्ताह



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन आणि शिक्षण विभाग यांनी विविध शाळा व महाविद्यालयांना ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर या कालावधीत मराठी भाषा आठवडा साजरा करण्याचे आवाहन केले होते. याच

उद्देशाने पुरंदर स्नेह ग्रंथ संग्रहालय, खारघर सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय यांच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने ८ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम खारघरमधील गोखले शाळा व एस क्लासेस येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक दीपक शिंदे म्हणाले की,मराठी ही केवळ भाषा नाही, तर संस्कृती, भावना आणि अस्मितेचा श्वास आहे.मराठी भाषा आठवडा हा आपल्या मातृभाषेबद्दल प्रेम, अभिमान आणि जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी पुरंदर स्नेह ग्रंथ संग्रहालयाचे आभार मानले.या प्रसंगी संग्रहालयाच्या ग्रंथपाल वर्षा शिरसकर, सहाय्यक ग्रंथपाल सिद्धी गुजर, गोखले शाळेच्या शिक्षिका गौरी शिंदे, वर्षा रोकडेउपस्थित होते.

# वाशी येथील कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ कीर्तनकारांचा यथोचित गौरव

**नवी मुंबई :**

शिव तुतारी प्रतिष्ठान नवी मुंबई संचलित कविता डॉट कॉम,मराठी ग्रंथ संचालनालय अधिकारी,ठाणे आणि मराठी साहित्य मंदिर,वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध कवी प्रा. अशोक बागवे यांचे माऊलींचे पसायदान या विषयावर,अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने व्याख्यान मराठी साहित्य मंदिर वाशी येथे आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी कविता स्पर्धा बक्षीस वितरण, रसिक कविता व्हिडिओ चित्रण स्पर्धा आणि नवी मुंबई येथील ज्येष्ठ कीर्तनकाराना देखील प्रा.अशोक बागवे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



या प्रसंगी कवी बागवे यांनी आपल्या आशयघन, ओघवत्या,रसाळ वाणीतून सर्व रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकले. पसायदानाच्या प्रत्येक ओवीचा अर्थ,शब्दांचा उच्चार,त्यामागील असणारे रंग, तरंग आणि अंतरंग उलगडत असताना, संत ज्ञानेश्वर महाराज यांनी पसायदान हे सर्वात शेवटी मागितले. पसायदानाचे अध्याय समजले नसतील तर,पसायदानाचा खरा अर्थ समजून येणार नाही असे सांगत जीवन प्रवासाचा गुरुमंत्र म्हणजे पसायदान आहे असे बागवे म्हणाले. कार्यक्रम सुरू होण्याआधी परशुराम ठाकूर प्रायोजित काव्य स्पर्धा बक्षीस वितरण करण्यात आले.

या वेळी नवी मुंबईत स्थित मान्यवर जेष्ठ कीर्तनकार महाराज सुरेश महाराज जाधव, बाळासाहेब महाराज शिंदे, जितेंद्र महाराज आवारे पंडीत महाराज वर्पे, प्रमिलाताई जाधव महाराज, संतोष महाराज पवळे, गोपाळ महाराज काळे, निलेश महाराज कुळकर्णी यांना बागवे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

आप्पा ठाकूर, डॉ.अशोक पाटील, साहेबराव ठाणगे,अशोक गुप्ते, रवींद्र नेने, अमरजा चव्हाण,राजेंद्र घरत, निलेश पालेकर,मनीषा पाटील,प्रा. नाना पाटीलतर संस्था यांच्यावतीने सुभाष कुलकर्णी,प्रशांत पाटील आणि प्रा. रवींद्र पाटील,विलास समेळ, शंकर गोपाळे, रमेश संकपाळ, कल्पना देशमुख, दादा पडळकर सतीश माळी हे उपस्थित होते.

# सावधानता जनजागृती आठवडा २०२५ भ्रष्टाचारमुक्त भारत–विकसित भारत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सावधानता जनजागृती आठवडा २०२५च्या निमित्ताने बँक ऑफ इंडिया, नवी मुंबई विभागामार्फत दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी विविध शाखांमध्ये ग्रामसभा व सावधानता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. हे कार्यक्रम केंद्रीय सतर्कता आयोग तसेच मुख्य कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पडले.

हा कार्यक्रम उरण, उलवे, नेरे, गव्हाण, न्हावा शेवा, शहापूर, पलावा सिटी, आसनगाव आणि वाकडपाडा. या शाखामध्ये आयोजित करण्यात आला होता. या ग्रामसभांमधून सर्वसामान्य नागरिकांना दैनंदिन जीवनात सावधानतेचे आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व पटवून देण्यात आले.या कार्यक्रमांना ग्राहक, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमांमधून समाजात प्रामाणिकता, पारदर्शकता आणि जबाबदार नागरिकत्वाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

बँक ऑफ इंडिया प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारी या मूल्यांना बळकट करण्यास कटिबद्ध असून, सावधानता जनजागृती आठवडा २०२५च्या भावनेशी सुसंगत उपक्रम झाला.



# ‘टाटा पॉवर’कडून लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतच्या भिवपुरी येथील टाटा पॉवर पंप स्टोरेज वीज प्रकल्पाविरोधात गावकऱ्यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण अखेर समाप्त करण्यात आले आहे. टाटा पॉवर प्रकल्प अधिकारीवर्गाने भिवपुरी ग्रामस्थांशी केलेल्या चर्चेअंती गावकऱ्यांच्या अनेक मागण्या लेखी स्वरूपात मान्य करण्यात आल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

या निमित्ताने अक्षय ऊर्जा आणि स्थानिक विकासासाठी टाटा पॉवर प्रकल्प भविष्यात कटीबद्ध राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. भिवपुरीच्या टाटा कंपनीच्या पंप स्टोरेज जल विद्युत प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक गावकऱ्यांसाठी



विविध उपक्रम राबविन्याचे धोरण कंपनीने जाहीर केले आहे. यामध्ये भिवपुरी ग्रामपंचायत पाणी टाकीवर पाणी शुद्धीकरण संयंत्राची उभारणी करून देण्यात येणार आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता युवकांसाठी त्यांच्या आवडीप्रमाणे व कंपनी धोरणानुसार बांधकामाशी संबंधित कौशल्यांवर आधारित व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करून रोजगार क्षमतेत वाढ करण्याचे या निमित्ताने आश्वासित करण्यात आले आहे. प्रकल्पाचे काम सुरू असताना ज्या घरांची पडझड झाली आहे त्या धनगरवाडीतील घरांना संयुक्त तपासणीनंतर दुरुस्ती करण्याबाबत ठोस पाऊल उचलले जाणार असल्याचे टाटा पॉवर प्रकल्पाने आंदोलनकर्त्या ग्रामस्थांना दिलेल्या लेखी आश्वासन दिले आहे

ग्रामपंचायतीने सांगितल्या प्रमाणे धनगरवाडीतील १९ कुटुंबांच्या घरांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक सोयी सुविधा निर्माण करण्याबरोबरच त्यांच्यासाठी काही पर्यायी व्यवस्था करता येऊ शकेल का याची चाचपणी करण्यात येणार आहे. भिवपुरी, मांडवणे आणि हुमगाव येथे आधीच दिलेल्या सौरदिव्यांव्यतिरिक्त आवश्यकता तपासून ग्रामपंचायत कार्यालय व शाळांमध्ये अतिरिक्त सौरदिवे बसविण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. एक ओपन जिम उभारण्यात येणार आहे. कंपनीच्या बांधकामामुळे परिसरातील बोअरवेलमधील पाण्याचे नुकसान झाल्याच्या तक्रारी तज्ज्ञामार्फत तपासून त्यावर उपाययोजना करण्याचे ठरले. ग्रामपंचायत कार्यालय आणि रोकडेवाडी-भिवपुरी रस्त्याला जोडणाऱ्या सुमारे दोन किमी रस्त्याच्या पट्ट्यातील खड्डे बुजवून, रस्त्याचे समतलीकरण आणि दाब काम करून रस्ता चांगल्या प्रकारे करण्याचे सूतोवाच देण्यात आले आहे.

## कोरस कंपनीत अपघात; कंत्राटी कामगार जखमी

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यात धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कोरस इंडिया प्रा.लि. कंपनीत घडलेल्या अपघाताने कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दोन दिवसांपूर्वी गोडाऊन परिसरात ट्रान्सपोर्ट लाईनचे मटेरियल खाली करण्यासाठी एक ट्रक आला होता, मात्र गाडी मागे घेत असताना ड्रायव्हरचा अंदाज चुकल्याने पाठीमागे माल खाली करण्यासाठी उभ्या असलेल्या कंत्राटी कामगारास धडक बसली.

या धडकेमुळे संबंधित कामगार गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे. या घटनेबाबत कंपनी प्रशासनाकडून अपघात किरकोळ होता असे सांगण्यात आले असून अधिकृत माहिती मिळाली नाही.

दरम्यान, धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखाना निरीक्षक तांबोळी यांनी सांगितले की, या अपघाताबाबत कंपनीकडून अहवाल मागवण्यात आला आहे. जर हा अपघात उत्पादन प्रक्रियेशी संबंधित असेल, तर आम्ही निश्चितच चौकशी करू, असे त्यांनी स्पष्ट केले.

भाजपचे धाटाव विभाग अध्यक्ष तथा कामगार नेते सचिन मोरे यांनी या घटनेचा निषेध नोंदवत सांगितले की, एका निष्पाप कंत्राटी कामगाराला गंभीर दुखापत झाली आहे. यासाठी जबाबदार कोण? कंत्राटी कामगार हाही कंपनी प्रशासनाच्या जबाबदारीचा भाग आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी फॅक्टरी इन्स्पेक्टरमार्फत झालीच पाहिजे तसेच भाजपचे तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली आमदार व मंत्रीमहोदयांशी चर्चा करून आवश्यक कारवाईसाठी मागणी करण्यात येईल.

# शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी ‘पोस्को महाराष्ट्र स्टील’चा सन्मान

### रोटरी क्लबकडून मुंबई येथील कार्यक्रमात ॲवार्ड

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

स्टील उद्योग क्षेत्रात आघाडीचे नाव असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीला शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल रोटरी नॅशनल सीएसआर अवॉर्ड २०२५ (वेस्टर्न झोन) या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

रोटरी क्लब ऑफ मुंबई पिअर (डीस्ट्रीक्ट ३१४१) ने आयोजित केलेला रोटरी नॅशनल सीएसआर अवॉर्ड २०२५ समारंभ ८ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील मोतीलाल ओसवाल टॉवर येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करण्यात आले. पश्चिम विभागातील तीन राज्यांमधून (गुजरात, महाराष्ट्र आणि गोवा) १६० कंपन्यांनी नामांकन सादर केले त्यापैकी २० कंपन्यांची निवड झाली.




माणगाव तालुक्यातील विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच इतर कल्याणकारी उपक्रम सातत्याने राबवत असते तसेच आसपासच्या परीसातील स्थानिक लोकांचे जीवनमान उचंविण्यावर आणि सक्षमीकरण करण्यावर नेहमीच भर दिला आहे. कंपनी मार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शाळांच्या मुलभूत सुविधांचा विकास व गुणवत्ता सुधारणा, शाळांमध्ये सिस्टरहूड रिलेशनशिप प्रकल्प, विज्ञान संच वाटप, शाळांमध्ये ई-लर्निंग चा सेट-अप, संगणक संच वाटप, विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी बस ची व्यवस्था, उच्चशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती असे विविध उपक्रम राबविले जातात.पोस्को कंपनी शिक्षण क्षेत्रामध्ये करत असलेल्या उपक्रमांचे निवड समितीने कौतुक केले. हा पुरस्कार केवळ आत्तापर्यंत केलेल्या कामगिरीचीच कबुली देत नाही तर एक चांगली सामाजिक चळवळ निर्माण करण्याच्या दिशेने आमचा प्रवास सुरू ठेवण्यासाठी आम्हाला प्रेरणा देतो, अशी भावना यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

## विद्यार्थ्यांना वन्यजीवांची ओळख

**माणगाव : बातमीदार**

वनविभागामार्फत राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहानिमीत्त न्यू इंग्लिश स्कूल, म्हसळा येथे शालेय विद्यार्थ्यांना वन्यजीवांची ओळख कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी विद्यार्थ्यांना परिसरात आढळणाऱ्या निवडक वन्यजीवांची माहिती दिली.

कुवसेकर यांनी महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरू, राज्यपक्षी हरियाल, राज्य फुलपाखरू निळवंत तसेच धनेश पक्षी, गिधाडे आणि जिल्ह्यात आढळून येणाऱ्या इतर वन्यजीवांबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली तसेच जंगलातील भुते म्हणून ओळखले जाणारे रात्री आवाज करणारे पक्षी यांच्याविषयी विद्यार्थी आणि वनरक्षकांना प्रात्यक्षिकासोबत रोचक माहिती दिली तसेच रायगड जिल्ह्याचा जिल्हा पक्षी याबद्दलही विद्यार्थ्यांना ज्ञान मिळाले.

म्हसळ्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी संजय पांढरकामे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाची प्रस्तावना वनरक्षक दीपक तेटगुरे यांनी केली, तर वनरक्षक भिमराव सूर्यतळ यांनी पेटी वाजवत वन्यजीवांवरील पोवाडा सादर करून कार्यक्रमाला सुरेख सुरुवात केली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला आहे, शंतनु कुवेसकर यांनी वन्यजीव सप्ताह २०२५ची थीम सेवा पर्व प्रमाणे निसर्गाप्रति सेवा आणि आपल्या जबाबदारीवर लक्ष केंद्रित करण्याची प्रतिज्ञा उपस्थित सर्व विद्यार्थ्यांकडून करून घेतली.

वनपरिक्षेत्र अधिकारी संजय पांढरकामे, वनपाल वैभव शिंदे, दिलीप वाघे, तुळशीराम चावरेकर, महादेव कराडे, सुभाष शिंदे, बापू रामोळे, विद्यासागर गोसावी आणि वनरक्षक दीपक तेटगुरे, भिमराव सूर्यतळ, लक्ष्मण राठोड, किरण बिन्नर, गजानन लालछोटे, शशिकांत चेवले, प्रदीप कोरडे, सचिन चव्हाण, प्रियांका जाधव, दीपाली मोहोळकर, जनाबाई गुद्दे, चरणदास चव्हाण, सागर घुबे, ऋषिकेश ढाकणे आणि न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य धरमचंद्र पाटील, पर्यवेक्षक जितेंद्र मांजरेकर, शिक्षक हणमंत मोरे, हरिश्चंद्र मुंडे, ज्ञानेश्वर आमले, रवींद्र गांगुर्डे, संजय वसावे, लालचंद सहारे, वसंत कामडी, निलेश गर्जे व संगीता शिर्के, रुपाली पाटील आदी व विद्यार्थी उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

वेबसाईट :www.panvelcorporation.com ईमेल : panvelcorporation@gmail.com

**Panvel Municipal Corporation General Election 2025**
**Final Ward Formation**
**Public Notice.**

It is hereby announced that Final Ward Formation for Panvel Municipal Corporation General Election 2025 is being published The details are as follows :-

| | |
|---|---|
| Date of publishing notification of the Final Ward formation | Saturday 11th October, 2025<br>Place :- Head Quarters of Panvel Municipal Corporation, all ward offices of Panvel Municipal corporation and on the website www. panvelcorporation.com of the Panvel Municipal Corporation |

जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५१९/५३६/२०२५
दिनांक :- १०/१०/२०२५

**PLACE:- Panvel**
**DATE:-11/10/2025**

**-Sd-**
**Commissioner**
**Panvel Municipal Corporation**



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

वेबसाईट :www.panvelcorporation.com ईमेल : panvelcorporation@gmail.com

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**अंतिम प्रभाग रचना**
**जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक व स्थळ | शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२५<br>स्थळ :- पनवेल महानगरपालिका, मुख्यालय, व महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर तसेच महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे |

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ११ ऑक्टोबर २०२५**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५१९/५३६/२०२५**
**दिनांक :- १०/१०/२०२५**

**सही/-**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**



**Government of Maharashtra**
**Forest Department**
**Mangrove Division South Konkan**
**Swapanapurti Bungalow, Behind Horizon Hall, Laxmi Nagar, Post Varsoli, Tal. Alibag, Dist Raigad-402 209.**
**Portal: http://mahatenders.gov.in**
**E- Tender Notice**

**Tender Notice No. DFO/MDSK/03/2025-26.**

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division- South Konkan, Swapanapurti Bungalow, Behind Horizon Hall, Laxmi Nagar, Post Varsoli, Tal. Alibag, Dist Raigad-402 209. from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website **http://mahatenders.gov.in** from **10/10/2025 at 5.00 pm to 17/10/2025 at 5.00 pm.** Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no./Mobile no. **9960802320/8149737146** during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website. If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: **1800 3070 2232.**

| Sr. No | Name of work | Estimated cost (Rs.) | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non-Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Providing & Erecting 1.6mt height Chain Link Fencing over UCR wall in Survey No-202, Mouje Pabhare, Kandalwada Beat, Mhasala Round in Alibag-Raigad Range of Mangrove Division South Konkan | 81,68,469/- | 81684/- | 4 Months. | Rs. 1180/- (Including GST |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.
2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

**SD/-**
**Divisional Forest Officer,**
**Mangrove Division South Konkan**

**क्रमांक : आरओसी-२०२५-२६-क्र-५/सी ३१०९**



**Government of Maharashtra**
**Forest Department**
**Mangrove Division South Konkan**
**Portal: http://mahatenders.gov.in**

**Tender Notice No. DFO/MDSK/07/2025-26**

Online Tender, for the following work are invited by the Divisional Forest Officer. Mangrove Division South Konkan (DFO, MDSK), Swapnapurti Bungalow, behind Horizon hall, At- Lakshminagar, Post- Varsoli, Taluka- Alibaug, District- Raigad, Pincode-402209 from the contractors/suppliers/Manufacturers.

The blank tender documents should be downloaded from the Government website **http://mahatenders.gov.in** from 10/10/2025 at 10.00 am to 16/10/2025 at 05.00 pm. Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors/suppliers have to download the tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone/mobile no +91 9850572888 during office hours.

The tenderers participating first time in e-tendering Bids will have to procure **Digital Signature Certificate, Username & Password** from the competent authorities as per guidelines mentioned on the homepage of the website. All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available in the above-mentioned website. If any assistance is required regarding e-Tendering (upload/download) please contact NIC Help Desk number: **1800 3070 2232**

| Sr. No | Name of work | Estimated cost (Rs.) | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for Supply | Cost of Blank Tender Form (Non-Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Supply of HDPE Hapa Nets (Material for fish nursery) at Raigad & Sindhudurg districts | 11,70,000/- | 50,000/- online net banking mode | Within 30 days | Rs. 3,000/-online net banking mode |

1) EMD and Tender fees exempted to the enlisted micro, small and medium enterprises listed as per "Micro, Small and Medium Enterprises Development Act, 2006".
2) To view Tender Notice, Detailed Time Schedule, Tender Document for this Tender and subsequently purchase the Tender Documents its supporting documents, kindly visit following e-tendering website of Government of Maharashtra- https:/mahatenders.gov.in
3) No changes are to be made by the tenderer in the tender documents published on the website. If any changes made, the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the tenderer. Information published on the government website will be final.
4) Right to reject any or all the tenders without assigning any reason thereof is reserved.

**SD/-**
**Divisional Forest Officer,**
**Mangrove Division South Konkan**

# पहिला दिवस भारताचा!

## विंडीजविरुद्ध यशस्वीचे शतक; संघाच्या धावा तीनशेपार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालने केलेली विक्रमांची 'बरसात' आणि सातत्याने अपयशी ठरलेला साई सुदर्शनच्या दमदार खेळीच्या जोरावर भारतीय संघाने दुसऱ्या कसोटीतील पहिला दिवस गाजवला. दिवसाअखेर भारतीय संघाने दोन विकेट्सच्या मोबदल्यात ३१८ धावा केल्या.

सन २०२४पासून घरच्या मैदानात खेळताना पहिल्या दिवशी भारतीय संघाने उभारलेली ही चौथ्या क्रमांकाची धावसंख्या ठरली. पहिल्या दिवसाचा खेळ थांबला त्या वेळी यशस्वी जैस्वाल १७२ धावांवर नाबाद खेळत होता. दुसऱ्या बाजूला कर्णधार शुबमन गिल २० धावांवर आहे.

शुबमनने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतल्यावर ५८ धावांवर लोकेश राहुलच्या रूपात टीम इंडियाला पहिला धक्का बसला. अनुभवी सलामीवीरानं ५४ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३८ धावांची खेळी केली. त्यानंतर यशस्वी आणि साई यांची जोडी जमली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १९३ धावांची दमदार भागीदारी रचत कॅरेबियन संघाला बॅकफुटवर ढकलले. यशस्वीला उत्तम साथ देताना साई चमकला खरा, मात्र शतकाची संधी हुकली. साई सुदर्शन याने १६५ चेंडूचा सामना करताना १२ चौकारांच्या मदतीने ८७ धावा केल्या. लोकेश राहुल पाठोपाठ त्याची विकेटही जोमेल वारिकन याने घेतली.

यशस्वी जैस्वाल याने पहिल्या डावातील पहिल्या दिवसाच्या खेळात नाबाद १७२ धावा केल्या. वयाच्या २३व्या वर्षी पाचव्यांदा १५० किंवा त्यापेक्षा अधिक धावा करणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला. याआधी कुणालाच अशी कामगिरी जमलेली नाही. दुसऱ्या दिवशी तो द्विशतकी डाव साधण्यासाठी मैदानात उतरेल.

लोकेश राहुलनंतर साई सुदर्शन बाद झाल्यावर कर्णधार शुभमन गिल मैदानावर आला आणि त्याने अत्यंत संयम आणि ठोस बचावात्मक तंत्र दाखवले. त्याने खैरी पिएरविरुद्ध दोनवेळा स्लॉग स्वीप मारला, पण एकूणच त्याचा दृष्टिकोन सावध होता.

# जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे सुयश






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयाने पनवेल महापालिका जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत सुयश संपादन केले आहे. राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा सुषमा पाटील विद्यालय कामोठे येथे आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींमध्ये सीकेटी विद्यालय मराठी माध्यमिक विभागाच्या स्नेहा संजय भोसले (इयत्ता सातवी) आणि १७ वर्षाखालील गटात शुभ्रा विजय पवार (इयत्ता नववी) हिने सुवर्णपदक पटकाविले. या विद्यार्थिनींची मुंबई विभागीय स्तरावर निवड झाली आहे. त्याचप्रमाणे १७ वर्षाखालील मुलांमध्ये कृष्णा सतीश शिंदे (इयत्ता दहावी) याने रौप्यपदक प्राप्त केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, मार्गदर्शक शिक्षक विलास यशवंतराव, ज्योती बडवी, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रोह्यात उद्या रॅपिड चेस टूर्नामेंट



**रोहा : प्रतिनिधी**

माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली रॅपिड चेस टूर्नामेंट २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रुपेश बामुगडे व महेश बामुगडे यांच्या संयोजनाखाली तसेच रोहा तालुका चेस असोसिएशनच्या सहकार्याने ओम नमः शिवाय, कालिदास हॉल, किल्ला येथे १२ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

या स्पर्धेत ओपन ग्रुप प्रथम पारितोषिक ५००० रुपये, द्वितीय ३००० हजार, तृतीय २५००, चतुर्थ २०००, पाचवे १५९९, सहावा ते आठवा क्रमांक ८०० आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देण्यात येईल. १५ वर्षाखालील ग्रुप प्रथम पारितोषिक ३००० रुपये, द्वितीय २०००, तृतीय १५००, चतुर्थ १०००, पाचवे ७००, सहावा ते आठवा क्रमांक ५०० आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह, विशेष बक्षिसे सर्वोत्कृष्ट ९, ११ वर्षाखालील मुलगा, मुलगी यांना ७०० रु. व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू १००० रु. व सन्मानचिन्ह, सर्वोत्तम रोहा तालुका खेळाडू (१५ वर्षाखालील) ८०० रु. व सन्मानचिन्ह, खुला गट ८०० रु. व सन्मानचिन्ह, वरिष्ठ खेळाडू (वय ६०) १००० रु. व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी अमर सलागरे (८०८७४५६१२३), विवेक कांबळे (७५५९१५५८९६), स्पर्धा संचालक संकेश खोत (७७६९९५४१०१), मुख्य पंच अविनाश मार्बल (९६५७१८६७७८), आपत्कालीन संपर्क विलास म्हात्रे (८८८८०११४११) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सहा सामन्यांनंतर शुबमनने जिंकला टॉस

**नवी दिल्ली** : भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यापूर्वी एक मजेशीर क्षण पाहायला मिळाला. टीम इंडियाचा युवा कर्णधार शुभमन गिल याने आपल्या सातव्या कसोटी सामन्यात पहिल्यांदा टॉस जिंकला.

रोहित शर्माच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीनंतर गिलला कर्णधार बनवण्यात आले आहे. गिलने इंग्लंड दौऱ्यावरील कसोटी मालिकेत कर्णधारपद भूषवले. या दौऱ्यावरील पाचही कसोटी सामन्यांमध्ये तो टॉस हरला होता. यानंतर वेस्ट इंडिजच्या भारत दौऱ्यात अहमदाबादमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीतही नाणेफेक त्याच्या बाजूने झाली नाही. आता सातव्या कसोटीत त्याचे नशीब उघडले आणि त्याने टॉस जिंकला. हे पाहताच भारतीय डगआऊटमध्ये आनंदाची लाट पसरली. संघातील सहकाऱ्यांसह सपोर्ट स्टाफनेही गिलचे अभिनंदन केले

# कबड्डीत 'सीकेटी'चा संघ उपविजेता




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे झालेल्या जिल्हास्तरीय १९ वर्षांखालील मुलींच्या कबड्डी स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाचा संघ उपविजेता ठरला.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी उपविजेत्या मुलींच्या कबड्डी संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रिचा घोषचा पराक्रम : वनडेत जलदगतीने एक हजार धावा करणारी पहिली भारतीय

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियातील विकेट किपर बॅटर रिचा घोष हिने विशाखापट्टणमच्या मैदानात पुन्हा एकदा आपल्या फलंदाजीतील धमक दाखवून दिली. तिचे शतक अवघ्या सहा धावांनी हुकले, पण रिचाच्या ९४ धावांच्या खेळीच्या जोरावर भारतीय महिला संघाला दक्षिण आफ्रिकेसमोर आव्हानात्मक धावसंख्या उभारणे शक्य झाले.

भारतीय महिला संघाने १०२ धावसंख्येवर सजा विकेट्स गमावल्या होत्या. या परिस्थिती मैदानात दमदार फलंदाजी करताना रिषा घोष हिने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात ११ चौकार आणि चार उत्तुंग षटकाराच्या मदतीने ७७ चेंडूत ९४ धावांची खेळी केली. या खेळीसह तिने महिला वनडेत १००० धावा करण्याचा टप्पाही पार केला. वनडे क्रिकेटमध्ये सर्वात जलदगतीने हा टप्पा गाठणारी ती तिसरी बॅटर ठरली आहे. या यादीत ऑस्ट्रेलियाची एश्ले गार्डन आणि इंग्लंडची नॅट सायव्हर ब्रंट तिच्या पुढे आहे. गार्डन हिने ९१७ चेंडूत, तर ब्रंटने ९४३ चेंडूत वनडेत हजार धावसंख्येचा पल्ला गाठला होता. रिचाने १०१० चेंडूचा सामना करत हा मैलाचा पल्ला पार केला.

रिचाने वनडे कारकिर्दीतील सातवे अर्धशतक झलकावले. ४६व्या सामन्यातील ४४ डावात तिने १००० धावांचा पल्ला गाठला. महिला वनडेत १००० धावांचा पल्ला गाठणारी ती १२वी बॅटर आहे, पण विकेट किपर बॅटरच्या रुपात हा मैलाचा पल्ला गाठणारी ती अंजू जैन हिच्यानंतर दुसरी भारतीय ठरते.

# एकाच खेळीत अनेक विक्रमांमध्ये 'यशस्वी'



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय क्रिकेटचा युवा फलंदाज यशस्वी जयस्वालने उल्लेखनीय कामगिरी केली. यशस्वीने २५३ चेंडूंत नाबाद १७३ धावा करत आपले सातवे कसोटी शतक पूर्ण केले. या दमदार खेळीमुळे तो महान खेळाडू डॉन ब्रॅडमन आणि सचिन तेंडुलकर यांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे.

फक्त २४ वर्षांच्या वयाच्या आत यशस्वीने कसोटी क्रिकेटमध्ये पाचव्यांदा १५० किंवा त्याहून अधिक धावा करण्याचा पराक्रम केला आहे. या यादीत त्याच्या पुढे फक्त ऑस्ट्रेलियाचे महान फलंदाज डॉन ब्रॅडमन आहेत, ज्यांनी वयाच्या २४ व्या वर्षापूर्वी आठ वेळा ही कामगिरी केली होती.

कसोटी शतकांच्या बाबतीतही यशस्वीने मोठी झेप घेतली. २४ वर्षांच्या वयाच्या आत यशस्वीने सात शतके पूर्ण करत जावेद मियांदाद, ग्रॅमी स्मिथ, ॲलिस्टर कुक आणि केन विल्यमसन यांसारख्या दिग्गजांच्या शतकांची बरोबरी केली. डॉन ब्रॅडमन (१२ शतके), सचिन तेंडुलकर (११ शतके) आणि गारफिल्ड सोबर्स (९ शतके) या तिघांनी यशस्वीपेक्षा जास्त शतके केली.

कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी १५०पेक्षा जास्त धावा करण्याची कामगिरी यशस्वीने दुसऱ्यांदा केली आहे.

### कसोटीत तीन हजार धावांचा टप्पाही केला पार

टीम इंडियाचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात आणखी एक मोठा डाव साधला आहे. या खेळीत त्याने कसोटी कारकिर्दीत तीन हजार धावांचा टप्पा पार केला. कसोटीत सर्वात जलदगतीने तीन हजार धावांचा पल्ला गाठणारा यशस्वी भारताचा दुसरा फलंदाज ठरला आहे. भारताकडून त्याच्यापेक्षा जलदगतीने ३००० धावा करण्याचा विक्रम हा लिटल मास्टर सुनील गावसकर यांच्या नावे आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात आधी १० हजार धावांचा पल्ला गाठणाऱ्या गावसकरांनी अवघ्या ६९ डावात कसोटी कारकिर्दीत तीन हजार धावा केल्या होत्या. यशस्वी जैस्वालने ७१व्या डावात हा पराक्रम करून दाखवला आहे. या कामगिरीसह त्याने अनेक दिग्गजांना मागे टाकले आहे.

# 'बीओआर'च्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेत चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडच्या अंडर-१९ मुलींच्या संघाने योनिक्स-सनराईज महाराष्ट्र वसई-विरार सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन ज्युनियर अंडर-१९ इंटर-डिस्ट्रिक्ट अ‍ॅण्ड स्टेट बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२५ या राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत आपला ठसा उमटवला आहे.

या शानदार कामगिरीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व खेळाडू आणि सहाय्यक पथकाचे अभिनंदन व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी रवींद्र भगत उपस्थित होते.

वसई येथे आयोजित करण्यात आलेल्या या चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांनी सहभाग घेतला होता. रायगडच्या मुलींनी या स्पर्धेत अत्यंत उल्लेखनीय खेळ सादर करत जिल्ह्याचे नाव उंचावले. या विजयी संघात प्रकृती शर्मा, गाथा सूर्यवंशी, अनुष्का एप्टे, आयुषी निर्वाण आणि मनस्वी रानवरे यांचा समावेश होता. त्यांच्या सांघिक प्रयत्नांमुळे आणि वैयक्तिक कौशल्यामुळे संघाने चमकदार यश संपादन केले.

संघाच्या या यशामध्ये प्रशिक्षक योगेश पाटील यांचे मार्गदर्शन आणि संघ व्यवस्थापक मयुरेश पाटील यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिनंदन





# सेमीफायनलसाठी टीम इंडियाच्या अडचणी वाढल्या



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत यजमानपद भारतीय संघाने पहिल्या लढतीत श्रीलंकेला, तर दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानला पराभूत करून लागोपाठ दोन सामने जिंकले, पण दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाला तीन गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला आहे. या पराभवाचा भारतीय संघाला फटका बसला असून सेमीफायनल गाठण्याचे समीकरण टफ असणार आहे.

भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना जिंकण्याची सुवर्णसंधी होती, पण शेवटच्या चार षटकात आफ्रिकेच्या फलंदाजांनी पुनरागमन केले व आपल्या संघाला विजय मिळवून दिला. दक्षिण आफ्रिकेला इंग्लंडकडून १० गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर झालेल्या न्यूझीलंड आणि भारतीय संघाविरुद्धच्या सामन्यात आफ्रिकेने दमदार विजयाची नोंद केली आहे, तर श्रीलंका आणि पाकिस्तानला पराभूत करणारा भारतीय संघ चार गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे.

इथून पुढे सर्व सामन्यांमध्ये भारतीय संघाला कडवी झुंज मिळणार आहे. १२ ऑक्टोबरला भारताचा सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. त्यानंतर पुढील सामने न्यझीलंड आणि इंग्लंडसोबत होणार आहे. हे सर्व सामने भारतीय संघासाठी अतिशय महत्त्वाचे असणार आहेत.

भारतीय संघाला पुढे चार सामने खेळायचे आहेत. हे सामने इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेशविरुद्ध आहेत. भारतीय संघाला जर सहज सेमीफायनलमध्ये प्रवेश करायचा असेल, तर या चारपैकी कमीत कमी तीन सामने तरी जिंकावे लागणार आहेत, पण जर असे झाले नाही, तर भारतीय संघाला इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावे लागेल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com